मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | शनिवार, ४ जानेवारी २०२५ | वर्ष: ६ | अंक: २१ | पाने-८ | किमत रु. २ + वितरण खर्च रु. १ एकूण रु.३

## इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेचे काम एका दिवसाचे नाही- मुख्यमंत्री

**पुणे, दि. ३ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज संत ज्ञानेश्वर माऊलींच्या दर्शनासाठी आळंदी येथे आले होते. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस हे पहिल्यांदाच आळंदी दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समधीचे दर्शन घेतले. इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेचे काम सुरू आहे. हे एका दिवसाचे काम नाही. सर्व गाव, शहरात उद्योगांचे पाणी जे इंद्रायणी मध्ये जाते ते साफ करून शुद्ध पाणी नदीत सोडायचे आहे. त्याचे काम सुरू केले आहे. यासाठी वेगवेगळी गावे, ग्रामपंचायत, नगरपंचायतींना निधी उपलब्ध करुन देत आहोत. तसे उद्योगांना देखील निर्देश दिले आहेत. त्यामुळे लवकरच इंद्रायणी स्वच्छ होणार आहे, असे ते त्यावेळी म्हणाले.

## संपादकीय
## खरीखरी
### श्रीनाथ की अनाथ

जगात बापाची सेवा करणारे पुत्र आणि पुत्री नाहीत असे नाही. त्यांचे आपल्या देशातल्या समस्त बापांच्या तर्फे अभिनंदन केलेच पाहिजे. परंतु या देशात असेही कुपुत्र आणि कुपुत्री आहेत की, ज्यांना आपल्या जन्मदात्या आई-बापांची सेवा करणे हा विषय तर समजतच नाही. त्या उलट त्यांच्या कष्टाने कमावलेल्या संपत्तीला हडप करून कायमस्वरूपी हे दिवटे आणि दिवटे असे गडप होतात की, त्यांना खेटरेही मारता येत नाहीत. 2023 सालात पद्मश्री पुरस्कार मिळालेले श्रीनाथजी खंडेलवाल हे आजच्या विषयाचे नायक आहेत. हे श्रीनाथजी खंडेलवाल म्हणजे एक संवेदनशील साहित्यिक, अनेक पुस्तके लिहिणारे, अनेक दुर्बोध पुस्तकांचे सुबोध भाषांतर करणारे एक विद्वान होते. पुण्यक्षेत्र वाराणसीच्या एका कुष्ठरोग्यांच्या वृद्धाश्रमात त्यांनी आपल्या अखेरचे दिवस घालवले. हे खंडेलवाल चांगले लेखक होते. त्यांची बरीच पुस्तके प्रकाशित झाली होती. जवळपास 250 हे 300 च्या संख्येत त्यांची ग्रंथसंपदा आहे. यांच्या पुस्तकाच्या विक्रीतून झालेली मिळकत किती असावी, असा प्रश्न जर विचारला तर त्याचे उत्तर आहे. जवळपास 80 ते 120 कोटी रुपये, अशा या साहित्यिकाच्या आणि कोमल, कवी हृदयाच्या लेखकाने आपला सर्व कारभार आपल्या पुत्र आणि पुत्रीकडे सोपवला होता. तिथेच दुर्दैवाची सुरुवात झाली असावी. विश्वास टाकणारा बाप भेटला पण हे पुत्र आणि पुत्री दोघेही जण कुपुत्र आणि कुपुत्री झाले. त्यांनी जिवंतपणी आपल्या जन्मदात्या बापाला वृद्धाश्रमाच्या नरक यातना झेलावयास भाग पाडले. त्या बिचाऱ्या बापाला कोणताही आजार नव्हता. तरीही त्यांना कुष्ठरोग्यांबरोबर देहावसनापर्यंत म्हणजेच अंतिम काळापर्यंत राहावे लागले. त्यांचा एवढाच दोष होता की, संधीसाधू अपत्यांवर त्यांनी विश्वास ठेवला होता. खंडेलवाल यांची ही दोन अपत्ये इतकी क्रूर आणि मग्रूर निघाली की, बापाच्या अंत्यविधीच्या क्षणी त्यांना काही सामाजिक कार्यकर्त्यांनी निरोप देऊनही बापाचे अंत्यदर्शन घेण्याचे साधे सौजन्यही त्यांनी दाखवले नाही. या दोन प्राण्यांना जर खरोखरच नरक असेल. तर त्यांना घोर कष्टकारी अशा कुंभीपाक नावाच्या नरकात जावे लागेल. नरक लोकात वैतरणी नावाची नदी असते. ती नदी पार करताना त्या घाणेरड्या नदीतील जलचर अशा कुकर्मी आणि पापी लोकांच्या शरीराचे लचके तोडतात. अशीच शिक्षा यांना मिळाली पाहिजे. वाराणसी म्हणजे काशी, या पवित्र पुण्यभूमीत जिचे नाव काशी आहे. तिथे अशा प्रकारची 'शी' करणाऱ्या या कुळविरोधी अपत्यांना त्यांचे कपडे काढून फटके मारले पाहिजेत. आपल्या मराठीत एक म्हण आहे. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' पण हे खरोखरचे गुंडी आणि गुंडा बापासाठी दंडा घेऊन बापालाच हाकलायला सरसावले. पद्मश्री पुरस्कार प्राप्त एका संवेदनशील लेखकाला आपलीच अपत्ये असलेल्या अशा आपल्याच रक्तातील गुंडांसमोर किती यातना सहन कराव्या लागल्या असतील. याची कल्पना केली. तर आपल्या अंगावर शहारे उभे राहतात. डोळ्यातून पाण्याच्या धारा वाहू लागतात. आपण या बिचाऱ्या दुर्दैवी खंडेलवाल यांना पाहिले नाही. त्यांचा आपला काही संबंध नाही, त्यांचे आपले काही नाते नाही. तरी आपल्या मनात त्यांच्याबद्दल कणव निर्माण होते. पण ज्यांच्या संपत्तीच्या बिळावर असे संधीसाधू नाग आणि नागिण फणा काढून बसले होते की त्यांच्या व मनातून आणि वागणुकीतून या बिचाऱ्या साहित्यिकाला म्हातारपणी किती अयाचित याचना झेलाव्या लागल्या असतील. त्याची कल्पनाही करवत नाही. चार-पाच दिवसांपूर्वी एका मुलाने तो इंजिनिअरिंगच्या परीक्षेत वारंवार नापास होतो. म्हणून हटकल्यावर आणि तो जिच्यावर लट्टू होता. ती मुलगी पसंत नाही असे आईबापाने म्हटल्यावर त्या दिवट्याने चक्क आईबापांचा खूनच करून टाकला. ही घटना नागपुरातील आहे. आपल्या नात्यातील हे भीषण वास्तव आजकाल वृत्तपत्रांना वेगवेगळ्या प्रकारे दररोज छापावे लागत आहे. ही मनाला वेदना देणारी बाब आहे. यावर जेवढे लिहावे तेवढे कमीच आहे. मात्र आजच्या कथेचे मूळ नायक, स्वर्गारोहण करणाऱ्या 'पद्मश्री' प्राप्त श्रीनाथ खंडेलवालांना आम्ही श्रद्धांजली अर्पण करतो आणि पुत्र आणि पुत्री म्हणून असलेल्या दोन कुलांगरांना असा शाप देतो की, यांची बोटे कुष्ठरोगाने झडावी आणि त्यांनाही अशीच परिस्थिती येऊन, त्यांच्या जखमांत किडे पडावेत. अजून बरेच आहे, पण त्या कुलांगार मंडळींची लायकी तेवढीच आहे.

इति लेखनसीमा !

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# फडणवीस-भुजबळांकडून एकमेकांचे कौतुक



वाक़िफ़ कहाँ ज़माना हमारी उड़ान से, वो और थे जो हार गए आसमान से- भुजबळ

मैं अकेला ही चला था जानिब-ए-मंज़िल मगर, लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया - फडणवीस

**सातारा, दि. ३ प्रतिनिधी**

वाक़िफ़ कहाँ ज़माना हमारी उड़ान से, वो और थे जो हार गए आसमान से', अशी शायरी छगन भुजबळ यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त साताऱ्यात नायगावमध्ये सावित्रीबाईंच्या मूळगावी आयोजित एका कार्यक्रमात बोलून दाखवली. त्याच्या या शायरीतही मंत्रिमंडळातून डावलल्याचा नाराजीचा सूर होता. दरम्यान त्यांच्या या शायरीला मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस यांनीही प्रतिसाद देत 'मैं अकेला ही चला था जानिब-ए-मंज़िल मगर, लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया' असं एकप्रकारे उत्तर दिलं आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. मात्र ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आलं. मंत्रिमंडळात जागा न मिळाल्याने छगन भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली. त्यांनी जाहीरपणे आपल्या भावना मांडल्या. ते देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला त्यांच्या बंगल्यावरही पोहोचले होते. आता एका कार्यक्रमानिमित्त पुन्हा एकदा भुजबळ आणि फडणवीस एकत्र आल्याने चर्चांना उधाण आले आहे.

छगन भुजबळ म्हणाले, "हरी नरके यांनी या वाड्यात सावित्रीबाईंचा जन्म झाला. त्यानंतर इथे स्मारक उभारायचे आम्ही ठरवले. मी त्यावेळी विधानपरिषदेचा आमदार होतो. तो निधी इथे वापरायचे ठरवले. देवेंद्र जी तुम्ही सावित्रीबाईंचे काम पुढे नेत आहात म्हणून तुमचे धन्यवाद. सावित्रीबाईंच्या नावाने पुरस्कार दिला जात होता. तो पुन्हा सुरु करुन सावित्रीबाईंच्या जयंतीदिनी द्यायला हवा. महात्मा फुलेंच्या साहित्याचे पुनर्मुद्रण व्हायला हवे अशी विनंती करतो." त्यानंतर त्यांनी 'वाक़िफ़ कहाँ ज़माना हमारी उड़ान से, वो और थे जो हार गए आसमान से' हा शेर भुजबळांनी म्हटला.

भुजबळ यांच्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी भाषण केले. त्यांनी बोलताना भुजबळ यांना उद्देशून 'मैं अकेला ही चला था जानिब-ए-मंज़िल मगर, लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया' हा शेर म्हटला. पुढे त्यांनी नायगावच्या सरपंचांनी मांडलेल्या मागण्या पूर्ण होतील असे आश्वासन दिले. सहा वर्षांनी सावित्रीबाई फुलेंची द्वीशताब्दी सुरु होणार आहे. त्याआधी सावित्रीबाईंच्या स्मारकासाठी आम्ही निधी कमी पडू देणार नाही असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# कोणत्या जिल्ह्याचा कोण पालकमंत्री
## संभाव्य यादी आली समोर

**मुंबई दि. ३ प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने सर्वाधिक जागा मिळवत सत्ता स्थापन केली आहे. यानंतर फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार देखील झाला. त्यामध्ये 39 मंत्र्यांना मंत्रिपद मिळालं. मात्र त्यानंतर कोणत्या जिल्ह्याचा पालकमंत्री कोण असणार असा प्रश्न सर्वांनाच पडला होता. मात्र, आता राज्यातील संभाव्य पालकमंत्र्यांची यादी समोर आली आहे. पाहा तर संभाव्य यादीत कोणता आमदार कोणत्या जिल्ह्याचा पालकमंत्री असणार?

**पालकमंत्री पदाची संभाव्य यादी अशी असेल :**

| | |
|---|---|
| नागपूर – चंद्रशेखर बावनकुळे | गडचिरोली – एकनाथ शिंदे |
| ठाणे – एकनाथ शिंदे | गोंदिया – राष्ट्रवादी अजित पवार |
| पुणे – अजित पवार | हिंगोली – आशिष जैस्वाल |
| बीड – अजित पवार | लातूर – गिरीष महाजन |
| सांगली – शंभूराज देसाई | मुंबई शहर – योगेश कदम |
| सातारा – शिवेंद्रराजे भोसले | मुंबई उपनगर – मंगलप्रभात लोढा |
| छत्रपती संभाजी नगर – संजय शिरसाठ / अतुल सावे | नांदेड – भाजपाकडे राहिल |
| जळगाव – गुलाबराव पाटील / भाजपाचा देखील दावा आहे | नंदुरबार – भाजपाचा दावा |
| यवतमाळ – संजय राठोड / भाजपाचा दावा देखील आहे | नाशिक – दादा भुसे / गिरीश महाजन यांचा देखील दावा |
| कोल्हापूर – हसन मुश्रीफ | पालघर – गणेश नाईक |
| अहमदनगर – राधाकृष्ण विखे पाटील | परभणी – मेघना बोर्डीकर |
| अकोला – माणिकराव कोकाटे | रायगड – भरत गोगावले / राष्ट्रवादीचा दावा कायम |
| अमरावती – चंद्रकांत पाटील | सिंधुदुर्ग- नितेश राणे |
| भंडारा – राष्ट्रवादी अजित पवार | रत्नागिरी – उदय सामंत |
| बुलढाणा – आकाश फुंडकर | सोलापूर – जयकुमार गोरे |
| चंद्रपूर – नरहरी झिरवळ | वर्धा – पंकज भोयर |
| धाराशीव – धनंजय मुंडे | वाशिम – माधुरी मिसाळ / इंद्रनील नाईक |
| धुळे – जयकुमार रावल | जालना – अतुल सावे |
| | लातूर – बाळासाहेब पाटील |

## एसआयटी अहवालानंतर मुंडेंच्या राजीनाम्याबद्दल निर्णयः विखे-पाटील

**पंढरपूर, दि. ३ प्रतिनिधी**

एसआयटी अहवाल आल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबद्दल निर्णय होईल, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी शुक्रवारी पंढरपुरात आले होते. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दरम्यान, मंत्री मंडळात खाते वाटप झाल्यावरून कोणतीही नाराजी नाही. जलसंपदा खाते विभागून दिल्याने नाराजी नाही. या खात्यात खूप काम करण्यासारखे आहे. नदी जोड प्रकल्प, तुटीचे गोदावरी खोरे यात काम करण्यास वाव आहे. महापालिका जिल्हा परिषद निवडणूक महायुती एकत्रपणे लढणार असून आधी दिलेले १० टक्के आरक्षण कायम आहे. मनोज जरांगे यांनी सरकारला वेळ दिला पाहिजे. लगेच उपोषणाला बसू नये, असे मत विखे-पाटील यांनी व्यक्त केले.

## सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचे चाकण बाजार समितीत अनावरण
### भुजबळ- शरद पवार एकाच मंचावर

**पुणे, दि. ३ प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने पुण्यात आज त्यांच्या पुतळ्याचे अनावर करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि माजी मंत्री छगन भुजबळ देखील उपस्थित होते. दरम्यान राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवारांनी माजी मंत्री छगन भुजबळांना पत्रिकेवर एक लिखित संदेश दिला, त्यानंतर दोघांमध्ये काही सेकंदाचा संवादही झाला अन् दोघे एकमेकांकडे हसूही लागले. हे सगळे घडले महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुलेंच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण सोहळ्यात.

चाकण बाजार समितीच्या प्रवेशद्वारावर सावित्रिबाई फुलेंचा पुतळा उभारण्यात आला आहे. याच मंचावर शरद पवार आणि छगन भुजबळ हे दोघे 5 वाजून 45 मिनिटांनी पोहचले. पुतळ्याचे अनावरण पवारांच्या हस्ते



होते. अध्यक्षस्थानी भुजबळ होते, त्यामुळे मंचावर दोघे एकमेकांच्या बाजूला बसले होते. मात्र मंचावर आल्यापासून दोघांनी एकमेकांकडे पाहणे ही टाळले होते.

मुळातच पवार हे पुण्यातील कार्यक्रमाला चार वाजताच पोहचले होते अन् भुजबळ तब्बल दीड तास उशिरा आल्याने पवारांना दीड तास ताटकळत बसावे लागले. त्यामुळे वेळेला महत्व देणाऱ्या पवारांना साहजिकच थोडा का होईना राग आला असेल याची कल्पना भुजबळांना होतीच. त्यामुळे मंचावर आल्यापासून भुजबळांनी ही बोलणे टाळले. मात्र त्याचवेळी पवारांनी पत्रिकेवर दोन ओळी मजकूर लिहिला. मग भुजबळांच्या हातातील पत्रिका काढून घेतली अन स्वतःच्या हातातील पत्रिका त्यांच्या हातात सोपवली. मग पवारांनी भुजबळांना खुणावले अन वीस मिनिटांनी दोघांमध्ये काही सेकंद संवाद झाला. त्यानंतर दोघे एकमेकांकडे पाहून हसले ही. मंचावरील या घडामोडींमुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगलेल्या आहेत.

छगन भुजबळ म्हणाले, समता परिषदेच्या सभेत आम्ही शरद पवार यांच्याकडे मंडल आयोगाची शिफारस करण्याची मागणी केली होती. त्याची अंमलबजावणी पवार साहेबांनी केली. शरद पवार यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलले.. त्यांना या कार्यक्रमाला बोलवले ते योग्य केले, छगन भुजबळ यांच्याकडून शरद पवार यांचे कौतुक केले.

## मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालाय लक्षात आहे ना?
### शिंदेंनी टोचले अधिकाऱ्यांचे कान

**मुंबई, दि. ३ प्रतिनिधी**

मुंब्र्यात मराठी आणि हिंदी भाषिक वाद चव्हाट्यावर आलंय. मराठी का येत नाही विचारणाऱ्या तरुणालाच माफी मागायला लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अशातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट सरकारी कामकाजात मराठीसाठी आग्रही भूमिका घेतल्याचे पहायला मिळाले. गृहनिर्माण विभाग अर्थात म्हाडाच्या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी म्हाडाच्या अधिकाऱ्यांना मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याचे लक्षात आणून दिले.



गृहनिर्माण विभागाच्या बैठकीत उपमुख्यमंत्र्यांचा मराठीचा आग्रह पहायला मिळाला. बैठकीत प्रेझेंटेशनमध्ये इंग्रजी स्लाइड दाखवण्यात आल्या. यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी मराठीत स्लाइडची विचारणा केली. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे हे लक्षात आहे ना ? अशी विचारणा उपमुख्यमंत्र्यांनी हसत खेळत केली. त्यानंतर लगेचच मराठी स्लाइड पडद्यावर आली .

नव्या गृहनिर्माण धोरणाचं सविस्तर प्रेझेंटेशन सादर केलं जात आहे. यावेळी एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषेतून प्रेझेंटेशन सादर करण्याची मागणी केली. 2007 नंतर गृहनिर्माण धोरण तयारच झालं नव्हत. या धोरणाबाबत तसेच विविध विषयांसदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

## छगन भुजबळांनी पक्ष काढावा, आम्ही युती करु - महादेव जानकर

**सातारा, दि. ३ प्रतिनिधी**

माजी मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी अनेकदा व्यक्त केली आहे. तसेच त्यांची मंत्रिपदाची संधी ही अजित पवार यांनी दिली नसल्याचे देखील अनेकदा त्यांच्या बोलण्यातून दिसून आले आहे. छगन भुजबळ हे शरद पवार यांच्या गटात जाणार की देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर भाजपमध्ये जाणार याची सर्वांना उत्सुकता लागली होती. यानंतर आता त्यातच आता राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी छगन भुजबळांना एक सल्ला दिला आहे. "छगन भुजबळ यांनी समता परिषदेच्या नावाने पक्ष काढावा", असे महादेव जानकर यांनी म्हटले आहे. यावरुन आता राजकीय वर्तुळामध्ये चर्चा सुरु झाल्या आहेत. "ओबीसींची अशीच अवस्था होणार आहे. ज्या समाजाचे दल आहे, त्या समाजाचे बळ आहे. अन्याय झाला म्हणून मी आता बोलू शकणार नाही. कारण आपला पक्ष नाही. आपण याचिकाकर्ते आहोत. देणारे बनणारे असाल, तर आम्ही आमचं दल केलं आहे. आम्ही त्यांना सांगितलं आहे की तुम्ही समता परिषदेच्या नावाने एखादा पक्ष काढा, आम्ही तुमच्याबरोबर युती करु. त्यांनी जर हा निर्णय घेतला तर चांगलं होईल. आज सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीदिवशी त्यांनी ते करावं. त्यांनी तो निर्णय घेतला तर चांगलं होईल.

## संतोष देशमुख हत्याप्रकरणाची खासदार बजरंग सोनवणेंनी केली राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे तक्रार

**नवी दिल्ली, दि. ३ वृत्तसंस्था**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर राज्यात संतापाचा उद्रेक झाला असतानाच आता हे प्रकरण दिल्लीत सुद्धा पोहोचलं आहे. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आगोयाची भेट घेत तक्रार दाखल केली आहे. संतोष देशमुख हत्येप्रकरणी आयोगाकडून दखल घेऊन चौकशी केली जावी, अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे.



बजरंग सोनावणे यांनी सांगितले की, मानवाधिकार आयोगाला आम्ही तक्रार दिली आहे. संतोष देशमुख प्रकरणी तपास होण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. सोनावणे यांनी दोन पोलिस अधिकाऱ्यांचे सीडीआर तपासले गेले पाहिजेत अशी मागणी केली आहे. त्यामुळे आता ते दोन पोलिस अधिकारी कोण? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. आयोगाने दखल घेतली की सर्व चौकशी होईल, असे ते म्हणाले.

दरम्यान, सरपंच देशमुख यांच्या कुटुंबीयांना माजलगावकरांनी मदतीचा हात पुढे केला आहे. या मदत फेरीतून तब्बल 43 लाख रुपये जमा झाले. सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांसाठी माजलगावकरांनी पुढाकार घेत माजलगाव तालुक्यातून जमा झालेला निधी आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत सरपंच देशमुख यांच्या कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आला. 9 डिसेंबर रोजी मसाजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली होती. या हत्यानंतर देशमुख कुटुंब यांना आधार मिळावा यासाठी माजलगाव शहरात मदत फेरी काढून व्यापारी प्रतिष्ठित नागरिक यांनी मदतीचा हात दिला. हा निधी मस्साजोग गावात जाऊन आमदार प्रकाश सोळंके यांच्यासह माजलगावातील नागरिकांनी सुपूर्द केला.

## अण्णा हजारेंना पुढे करून काही बेईमान लोकांनी दिल्लीला संकटात ढकलले
### पंतप्रधान मोदींचा केजरीवालांवर हल्लाबोल

**नवी दिल्ली, दि. ३ वृत्तसंस्था**

आम आदमी पार्टी अर्थात आप ही आपत्ती आहे. ती सहन करणार नाही आणि दिल्लीतील परिस्थिती बदलल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार दिल्लीतील मतदारांनी केला असल्याचे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपविरोधात प्रचाराचे रणशिंग फुंकले. अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांना बेईमान लोक म्हणत मोदींनी वार केला. अण्णा हजारेंना पुढे करून काही लोकांनी दिल्लीला संकटात ढकलले, असे ते म्हणाले.

दिल्लीतील अशोक विहार येथे झोपडपट्टी धारकांना घरांचे वाटप करण्यात आले. १६७५ झोपडपट्टीधारकांना फ्लॅटच्या चाव्या देण्यात आल्या. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अरविंद केजरीवाल आणि आप सरकारवर जोरदार हल्ला चढवला. पंतप्रधान मोदी म्हणाले, "अण्णा हजारेजींना समोर करून काही कट्टर बेईमान लोकांनी दिल्लीला आपत्तीमध्ये ढकललं. मद्य परवाना प्रकरणात घोटाळा, मुलांच्या शाळेत घोटाळा, गरिबांच्या उपचारात भ्रष्टाचार, प्रदूषणाविरोधात लढण्याच्या नावाखाली भ्रष्टाचार, नोकर भरतीत भ्रष्टाचार. हे लोक दिल्लीच्या विकासाच्या गोष्टी करत होते. पण, हे लोक, आप आपत्तीच्या रुपात दिल्लीवर तुटून पडली आहे."

पंतप्रधान मोदींनी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर बोट ठेवत आप सरकारला लक्ष्य केले. "हे लोक इथे भ्रष्टाचार करतात. आणि त्याचे समर्थनही करतात. चोर तर चोर वर शिरजोर! आप ही आपत्ती दिल्लीवर आलेली आहे. त्यामुळे दिल्लीकरांनी आपत्तीविरोधात लढाईचे रणशिंग फुंकलं आहे. दिल्लीतील मतदारांनी दिल्लीला आपत्तीतून (आप) मुक्त करण्याचा निर्धार केला आहे", अशी टीका पंतप्रधान मोदींनी केली. "दिल्लीतील प्रत्येक नागरिक म्हणतोय, दिल्लीतील प्रत्येक मुलं म्हणतेय, दिल्लीतील प्रत्येक गल्लीतून आवाज येतोय की आपत्ती सहन करणार नाही बदलल्याशिवाय राहणार नाही. आपत्ती सहन करणार नाही, बदलल्याशिवाय राहणार नाही", असे मोदी दिल्लीतील कार्यक्रमात बोलताना म्हणाले.

## ग्रामसेवकांना बायोमेट्रिक हजेरी लागू होणार

**मुंबई, दि. ३ प्रतिनिधी**

ग्रामसेवकांना आता बायोमॅट्रिक हजेरी लागू करण्यात येणार आहे. राज्य सरकारने यासंदर्भातल्या सूचना आता पुन्हा एकदा जारी केल्या आहेत. ग्रामपंचायतीच्या कामाला शिस्त लावण्यासाठी राज्यसरकारने ग्रामसेवकांना बायोमॅट्रिक हजेरी लागू करण्याचा हा निर्णय घेतला आहे. ग्रामविकास विभागाच्या उपसचिव सीमा जाधव यांनी अलीकडेच राज्यातील सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र पाठवलेलं आहे. यात ग्रामसेवकांची हजेरी जीपीएस आणि बायोमॅट्रिक प्रणालितून घेण्याचा आग्रह घेण्यात आला आहे. विधीमंडळात ग्रामविकासाबाबत झालेल्या चर्चेतून जिल्हा परिषदांकडून ग्रामसेवकांच्या हजेरी बाबत माहितीसुद्धा मागवण्यात आलेली होती. त्यामुळे आता ग्रामसेवकांना सुद्धा बायोमॅट्रिक हजेरी लावणं बंधनकारक आहे.

## माझ्या पराभवाला वरिष्ठ कारणीभूत- राजन साळवी

**रत्नागिरी, दि. ३ प्रतिनिधी**

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे माजी आमदार राजन साळवी हे पक्ष बदलणार असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु होत्या. त्यानंतर भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी ते चांगले कार्यकर्ते आहेत, असं म्हटल्यामुळे राजन साळवी भाजपमध्ये प्रवेश करतील असं बोललं जात होतं. मात्र, काल राजन साळवी यांनी प्रवीण दरेकर यांच्याबाबतही प्रतिक्रिया दिली होती. "मी निष्ठावंत शिवसैनिक आहे. पिकलेल्या आंब्यावर कोणीतरी दगड मारतात, तशा प्रकारचा प्रयत्न भाजप आणि अन्य कोणाचा असेल. पक्षात येणाऱ्या प्रत्येकाचं स्वागत करणं हे प्रत्येक पक्षाच्या प्रमुखाचे कर्तव्य असते. त्यामुळे त्यांनी भावना व्यक्त केल्या असतील. मी मतदार संघात काम करत आहे", असं राजन साळवी म्हणाले होते. त्यामुळे पक्ष बदलाच्या चर्चेला पुर्णविराम मिळाला होता. मात्र, आज पुन्हा एकदा राजन साळवींनी पक्ष बदलाचे संकेत दिले आहेत. राजन साळवी म्हणाले, मागच्या काही दिवसांपासून माझ्या बाबतीत पक्ष प्रवेशाच्या बातम्या येत आहेत. माझ्या कार्यकर्त्यांनी देखील याबाबत मला विचारणा केली. त्यावेळी त्यांना मी योग्य वेळी योग्य निर्णय घेईल असं सांगितलं आहे. लांजा असेल किंवा राजापूर या ठिकाणच्या पराभवाचा मंथन करत असताना भविष्याची दिशा काय याबाबत प्रश्न विचारले. त्यावेळी त्यांना योग्य वेळी योग्य निर्णय घेणार असल्याचं मी सांगितल्याचं साळवी यांनी म्हटलं आहे. दरम्यान माझ्या पराभवाला वरिष्ठ कारणीभूत आहेत, असं साळवी यांनी म्हटलंय. त्यामुळे आता साळवी यांनी पक्ष बदलाचे संकेत दिल्याचं स्पष्ट झाला आहे. आज माझ्यावर अशी वेळ आली अशी इतर कार्यकर्त्यांवर देखील येईल असं सांगायलाही साळवी विसलेलेल नाहीत. त्यामुळे साळवी यांच्या पराभवाला कारणीभूत ठरलेला वरिष्ठ नेता कोण? राजन साळवी यांचा नेमका रोख कुणाकडे? याबाबत आता प्रश्न निर्माण झाले आहेत.




## आव्हाडांच्या पत्रकार परिषदेवर पोलिसांचा वॉच ?

**ठाणे, दि. ३ प्रतिनिधी**

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषद सुरू असताना पोलीस खात्याचा एक व्यक्ती त्याचे गोपनीय पद्धतीने शुटींग करत असल्याची बाब उघडकीस आली आहे. त्यामुळे, जितेंद्र आव्हाड यांच्या पत्रकार परिषदेवर गोपनीय विभागातील पोलिसांचे लक्ष आहे का, सरकारने त्यांना अशारितीने पाठवले आहे का, असा सवाल उपस्थित करत आमदार आव्हाड यांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच, ही बाब लक्षात येताच त्यांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याला आपल्या घरातच ठेऊन घेतले आहे. जितेंद्र आव्हाड यांची पत्रकार परिषद सुरू असताना ठाण्याच्या एसबीचे (गोपनीय विभाग) पोलीस शूटिंग करत होते. त्यावरुन, पत्रकार परिषद सुरू असताना आव्हाड भडकले. तसेच, विरोधी



पक्षातील नेत्यांवर पोलीस का वॉच ठेवत आहेत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

पोलिसांनी आमच्यावर वॉच ठेवण्यापेक्षा वाल्मिकी कराडवर वॉच ठेवावा. माझ्या खासगी घरात पत्रकार परिषद सुरू असताना पोलीस घुसतात कसे? सरकारला नक्की वॉच ठेवून काय करायचे आहे? अशी प्रश्नांची सरबत्ती आव्हाड यांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याच्या वरिष्ठांना फोनद्वारे केली. तसेच, आपल्या पोलीस कर्मचाऱ्याला मी घरातच ठेऊन घेत आहे, जोपर्यंत तुमचे वरिष्ठ अधिकारी इथं येऊन याबाबत खुलासा करत नाहीत, तोपर्यंत मी त्यांना सोडणार नाही. मग, रात्र झाली तरी चालेल, अशा शब्दात जितेंद्र आव्हाड यांनी पोलिसांना दम भरला.

हे धक्कादायक आहे, तो माणूस माझ्या घरामध्ये पकडला गेला. विरोधी पक्षाला काय जगू द्यायचे की नाही. एवढा वॉच ठेवायचा आहे, तर बीडमध्ये मर्डर झाल्यावर वाल्मिक कराडवर वॉच ठेवायला पाहिजे होता ना, लवकर सापडला असता, पोलिसांची लाज तरी राहिली असती, असे आव्हाड म्हणाले. हे आता आमच्यावरच वॉच ठेवत आहेत. हे सगळं तुमच्यासमोर घडलं आहे. हे काय बनाव वगैरे नाही, तुमच्या नजरेसमोर झालंय आणि हे मला माहित नव्हतं हे लक्षात आणून दिलेलं आहे, असेही आव्हाड पत्रकारांना उद्देशून म्हटले.

## संक्षिप्त

### बांधकाम कामगारांची वेबसाईट व पोर्टल सुरु करण्याचे कामगार मंत्र्यांचे आश्वासन

**भिवंडी, दि. ३ : प्रतिनिधी**

बांधकाम कामगारांची वेबसाईट व पोर्टल सुरू करण्याबाबत लवकरच सकारात्मक तोडगा काढण्यात येईल,असे आश्वासन गुरुवारी मंत्रालयात आयटक बांधकाम कामगार फेडरेशनच्या शिष्टमंडळाला कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिले.यावेळी शिष्टमंडळात आयटक बांधकाम कामगार फेडरेशनचे राज्य कार्याध्यक्ष कॉ. विजय कांबळे, राज्य उपाध्यक्ष कॉ. सुनील पाटील,कॉ.धनराज कांबळे, राज्य सहसचिव कॉ.संभाजी भेरे,कॉ.रमेश जाधव प्रामुख्याने उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना फेडरेशन आयटकचे शिष्टमंडळाने मुंबईतील मंत्रालयात कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची भेट घेऊन आयटक च्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.दरम्यान बांधकाम कामगारांची वेबसाईट व पोर्टल सुरू करण्याबाबत सकारात्मक तोडगा काढण्यात येईल व त्याबाबत लवकरच आयटक संघटनेसोबत सविस्तर चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात येईल,असे यावेळी मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले आहे.

### कंपनीतून रोख रकमेची चोरी

**भिवंडी, दि. ३ : प्रतिनिधी**

तालुक्यातील ओवळी गावच्या हद्दीतील एका इलेक्ट्रिक कंपनीतून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याच्या विरोधात नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,नीलकंठ म्हात्रे हे गोवंडी पूर्वेत राहत असून त्यांची ओवळीतील सागर कॉम्प्लेक्स मध्ये स्काय इलेक्ट्रॉनिक प्रायव्हेट लिमिटेड नावाने कंपनी आहे.यामध्ये अज्ञात चोरट्याने १ जानेवारी सायंकाळी ५ वाजता ते २ जानेवारी रोजी सकाळी पाऊणे नऊ वाजताच्या सुमारास कंपनीत प्रवेश करून १ लाख ४१ हजार ३९० रुपयांची रोख रक्कम चोरून नेली आहे.याप्रकरणी अज्ञात चोरट्यावर नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पोलिस त्याचा सिसीटिव्ही च्या सहाय्याने शोध घेत आहेत.पुढील तपास पोउनि भरत उबले करीत आहेत.

### ठाणे महापालिकेची सुमारे चार हजार अनधिकृत फलकांवर कारवाई, तर 76 गुन्हे दाखल

**ठाणे, दि. ३ : प्रतिनिधी**

ठाणे महापालिकेने डिसेंबर महिन्यात ३ हजार ८९१ अनधिकृत फलकांवर कारवाई केली आहे. तर, ७६ प्रकरणात गुन्हे दाखल केले. अनधिकृत फलक हटवण्याची मोहीम सातत्याने सुरू ठेवण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. ठाणे शहरात मोठ्याप्रमाणात बेकायदेशिररित्या फलक उभारले जात आहेत. या फलकांमुळे शहर विद्रूप होते. फलकांविषयी नागरिकांकडून तक्रारीही प्राप्त होतात. ठाणे महापालिकेचा अतिक्रमण विभाग आणि प्रभाग समिती मार्फत डिसेंबर महिन्यात ३ हजार ८९१ अनधिकृत फलक हटवण्यात आले. तर एकूण ७६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती उपायुक्त शंकर पाटोळे यांनी दिली. अनधिकृत फलक आढळला तर त्यावर नोटीस आणि गुन्हे दाखल करणे ही कारवाई अतिशय प्रभावीपणे करण्यात यावी, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. तसेच, ठाणे महापालिका हद्दीत अधिकृत फलक उभारण्यासाठी जाहिरात विभागाने जागा निश्चित केल्या आहेत. त्याचे शुल्क भरून केवळ त्याच ठराविक भागात फलक उभारता येणार आहेत. अशी माहिती पाटोळे यांनी दिली.

### माजी सरपंच हल्ला प्रकरणी 3 संशयित अटकेत

**ठाणे, दि. ३ : प्रतिनिधी**

गुरुवारी सकाळी अजनूप ग्रामपंचायत चे माजी सरपंच कदम उघडा हे काही कामानिमित्त आपल्या कार ने शहापूर कडे निघाले असता अजनूप शिरोळ दरम्यान च्या गायधरा गावा च्या पुढे दबा धरून बसलेल्या काही हल्लेखोरांनी अजनुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कदम उघडा यांच्यावर हल्ला करत चार चाकी गाडी फोडत बेदम मारहाण केली होती.

या मारहाणीत माजी सरपंचाचे दोन्ही पाय तुटल्याने उपचारासाठी प्रथम शहापूर येथील रूग्णालयात दाखल केले होते. मात्र दोन्ही पायांना गंभीर दुखापत होऊन फॅक्चर झाल्याने पुढील उपचारासाठी कल्याण येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस.स्वामी यांनी घटनास्थळी भेट देत पहाणी केली. या घटने चे गांभीर्य लक्षात घेत शहापूर उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कसारा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सुनील गावित, सहायक पोलीस निरीक्षक भोसले यांनी तपास चक्र फरवीत 24 तासाच्या आत कुंजल गोकुळ सांडे, शांताराम भाऊ भगत, कैलास पांडू कांमडी या 3 संशयित हल्लेखोरांना ताब्यात घेतले असून अजून फरार आरोपींचा शोध कसारा पोलीस घेत आहे.

## मराठी तरुणाला माफी मागायला लावणाऱ्यांचा मुंब्रा पोलीस ठाण्याबाहेर गोंधळ, पोलिसांकडून गुन्हा दाखल

**ठाणे, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंब्रा येथे एका मराठी तरुणाने फळ विक्रेत्याला मराठी बोलण्याचा आग्रह धरल्याने त्याला कान पकडून माफी मागायला लावल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. माफी मागण्यास लावणाऱ्या २० ते २५ जणांनी मुंब्रा पोलीस ठाण्याबाहेर गोंधळ घातल्याचे समोर आले आहे. 'आम्ही सांगतो तसेच गुन्हे दाखल करा, आरोपीला तत्काळ अटक करा' असे म्हणत त्यांनी गोंधळ घातला होता. त्यामुळे मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अविनाश जाधव म्हणाले आता भोगा...

'मराठी बोलणं गुन्हा ठरलाय, मराठीसाठी माफी मागावी लागतीये तेही महाराष्ट्रात! हे आता मुंबई आणि महाराष्ट्रातील प्रत्येक चौकात होणार, आणि मराठी माणूस फक्त पाहत राहील. याच साठी महाराष्ट्राला राज साहेब हवे होते... आता भोगा कर्माची फळ...' असे त्यांनी त्यांच्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये म्हटले आहे.

डायघर भागात राहणारा २१ वर्षीय मुलगा गुरुवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास मुंब्रा येथील कौसा भागात फळविक्रेत्याकडे फळ खरेदी करण्यासाठी गेला होता. त्यावेळी फळ विक्रेता त्याच्याशी हिंदीत बोलू लागला. त्यामुळे मराठी बोला असे तो तरुण फळ विक्रेत्याला म्हणाला. त्यामुळे फळ विक्रेता आणि तरुणामध्ये वाद झाला. या वादानंतर फळ विक्रेत्याने त्याच्या सहकाऱ्यांना बोलाविले. ते सहकारी आल्यानंतर त्यांनी तरुणाला कान पकडून माफी मागण्यास भाग पाडले. तसेच तो माफी मागत असल्याचे मोबाईलवर चित्रीकरणही केले. या घटनेनंतर फळ विक्रेता त्याच्या सहकाऱ्यांसह मुंब्रा पोलीस ठाण्यात गेला. तसेच त्या तरुणाविरोधात त्याने तक्रार दाखल केली. तरुणाविरोधात मुंब्रा पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, याच वेळी त्या फळविक्रेत्यासोबत आलेले २० ते २५ जण तरुणावर गुन्हा दाखल करण्याची घोषणाबाजी करु लागले. 'आम्ही सांगतो तसेच गुन्हे दाखल करा, आरोपीला तत्काळ अटक करा' अशी आरडा-ओरड करू लागले. मुंब्रा पोलिसांनी आता त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्याविरोधात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## सर्वांना एकत्र नेण्याचा विचार रुजावा

### रा. स्व. संघाच्या बंधुता परिषदेत दलित नेत्यांकडून अपेक्षा

**कराड, दि. ३ : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कराड शाखेस २ जानेवारी १९४० रोजी भेटीसह व्यक्त केलेल्या सद्भावनेच्या ऐतिहासिक घटनेचे स्मरण म्हणून त्या ठिकाणीच लोककल्याण मंडळ न्यासातर्फे आज बंधुता परिषद आणि आपुलकी मेळाव्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित दलित नेत्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाप्रती सद्भावना व्यक्त करताना, या परिषदेतून सर्वांना एकत्र घेऊन जाण्याचा विचार रुजावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या परिषदेच्या अध्यक्षस्थानी विवेक विचार मंचचे अध्यक्ष माजी खासदार प्रदीप रावत होते. तर, देहूरोड धम्मभूमी न्यासाचे विश्वस्त ॲड. क्षितिज गायकवाड, दलित महासंघाध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे, बौद्ध युवक संघटनेचे विजय गव्हाळे, विनोद अल्हाटे, भरत अमदापुरे, आमदार डॉ. अतुल भोसले, विक्रम पावसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रदीप रावत यांनी समाजात बंधुता रुजवण्यासाठी एकदिलाने काम करू या, असे आवाहन केले. ॲड. क्षितिज गायकवाड म्हणाले, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात बंधुत्वाचा उल्लेख केला असून, संघाचे संस्थापक केशव बळीराम हेडगेवार यांनी संघाच्या माध्यमातून बंधुत्वाची भावना रुजविण्याचे काम केले. सर्वांना एकत्र घेऊन जाण्याचा विचार बंधुता परिषदेतून व्हावा. समाजात वाढीस लागलेली वैचारिक अस्पृश्यता संपली पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी या वेळी व्यक्त केली. विजय गव्हाळे म्हणाले, की बाबासाहेबांच्या मते संघामध्ये सलगी नसली, तरी दुरावाही नव्हता. मैत्री नसली, तरी वैरभाव नव्हते. आज बाबासाहेबांना अपेक्षित असलेल्या बंधुत्वाची देशाला खूप गरज आहे. हिंदू आणि बौद्ध एकत्र आल्यास त्यांचा आवाज जगभरात पोहोचेल.

प्रास्ताविकात भरत अमदापुरे यांनी बाबासाहेबांच्या परिवर्तनवादी आणि सुधारणावादी चळवळीवर प्रकाशझोत टाकला. बाबासाहेबांचा संघाबाबत असलेला आपलेपणा आणि बंधुता हा धागा धरून या बंधुता परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी ब्राह्मण-दलित एक होऊ शकतात, हे या परिषदेच्या माध्यमातून दाखवून दिले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## ठाण्यातील 39 बिल्डरांना महापालिकेच्या नोटिसा, हवा प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन

**ठाणे, दि. ३ : प्रतिनिधी**

हवा प्रदूषण नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या २९७ पैकी ३९ बांधकाम व्यावसायिकांना ठाणे महापालिकेने कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता राखण्यासाठी महापालिकेमार्फत विविध उपाय केले जात आहेत. त्यामुळे २९७ बांधकाम व्यावसायिकांना हवा प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे निर्देश दिले होते. या नियमावलीचे पालन न करणाऱ्या ३९ बांधकाम व्यावसायिकांनी नियमावलीचे तत्काळ पालन न केल्यास त्यांना तातडीने काम थांबविण्याचे आदेश दिले जाणार आहेत.

ठाण्यातील २९७ बांधकाम व्यावसायिकांपैकी ३१ जणांनी सर्व नियमावलीचे पालन केले, तर १५१ जणांकडे काही त्रुटी आढळल्याने त्यांना सुमारे चार लाखांचा दंड आकारून अटींची पूर्तता करण्यास बजावले आहे. ३९ जणांनी नियमावलीची पूर्तता न केल्याने त्यांना बांधकाम का थांबवू नये, अशी विचारणा करणारी नोटीस ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी बजावली. त्यांच्याकडून नियमांची पूर्तता न झाल्यास काम तत्काळ थांबविण्याचे आदेश काढावेत, असे निर्देश माळवी यांनी दिले. सर्व २९७ बांधकाम स्थळांना अचानक भेट देऊन सर्व नियमांचे पालन होत असल्याची खात्री पर्यावरण विभागाने सतत करावी, असेही माळवी यांनी स्पष्ट केले.

**अतिरिक्त आयुक्तांनी घेतला आढावा**

- ठाणे महापालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता राखण्यासाठी उच्च न्यायालयाने जनहित याचिकेच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार ठाणे महापालिकेच्या पर्यावरण विभागाने विविध प्रकारच्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

- या उपाययोजनांचा आढावा बुधवारी माळवी यांनी घेतला. या आढावा बैठकीस, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त पद्मश्री बैनाडे यांच्यासह महापालिकेचे अनेक अधिकारी उपस्थित होते.

**आदेश काय दिले?**

सर्व यंत्रणांनी महापालिकेच्या समन्वयाने उच्च न्यायालय आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश माळवी यांनी दिले.

हवा प्रदूषणाबाबत महापालिकेकडे प्राप्त झालेल्या विविध तक्रारींबाबत पर्यावरण विभागाने १ लाख ७० हजारांच्या दंड वसुलीची कारवाई केल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, विकासकांनी प्रकल्पात, ५० ठिकाणी हवा प्रदूषण मोजणी यंत्र बसविले आहे. इतरांनीही ही यंत्रणा बसवावी. कुचराई झाल्यास अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात येईल, असा इशारा माळवींनी दिला.

## वाहतूक विभाग पोलिसांची 71 मद्यधुंद वाहनचालकांवर कारवाई

**अंबरनाथ, दि. ३ : प्रतिनिधी**

अंबरनाथ वाहतूक पोलिसांनी २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या ४४ वाहनचालकांवर कारवाई केली आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री वाहतूक पोलिसांनी शहराच्या पूर्व आणि पश्चिमेकडील मुख्य चौकात चोख बंदोबस्त ठेवून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली. ३१ रोजी रात्री २९ मद्यपींना पकडून १० हजार रुपयांचा दंड भरण्यास सांगितल्यावर त्यांची नशा दूर झाली. पोलिसांनी त्यांची वाहने जप्त केली आहेत. त्यांना न्यायालयात पाठवले जाईल, तेथून दंड भरल्यानंतर त्यांना परत केले जाईल. असे वाहतूक विभागकडून सांगण्यात आले आहे. वाहतूक पोलिसांच्या कडक कारवाईमुळे वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण होते. त्यामुळे शहरात एकही दुर्घटना घडलेली नाही. वाहतूक एसीपी पोवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी रात्रभर राहून ही कारवाई केली. तसेच ३१ डिसेंबरच्या दोन दिवसांपूर्वी शहरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंड करण्याऐवजी वाहतूक पोलिसांनी त्यांना फुले देऊन नियमांचे उल्लंघन करू नका असे सांगितले होते. अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल असे सांगितले होते. अंबरनाथ, उल्हासनगर आणि विठ्ठलवाडी वाहतूक पोलिसांनी ३१ डिसेंबरच्या रात्री अनेक ठिकाणी नाकाबंदी करून ४६० वाहनांवर मोटर वाहन कायद्यान्वये कारवाई केली आहे. अशी माहिती एसीपी विजय पोवार यांनी दिली आहे. अंबरनाथ २९, उल्हासनगर २४, विठ्ठलवाडी १८ अशा एकूण ७१ मद्यधुंद वाहनचालकांवर कारवाई केली तसेच मोटार वाहन कायद्यान्वये इतर कारवाई करण्यात आलेचे सांगण्यात आले आहे.

## हिंजवडी आयटी पार्क लवकरच 'कोंडी'मुक्त!

### पर्यायी रस्त्यांसह उड्डाणपुलाच्या 650 कोटींच्या कामांना एमआयडीसीकडून गती

**पुणे, दि. ३ : प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे या कोंडीबाबत सातत्याने आयटीयन्स तक्रार करीत असतात. आता ही कोंडी सोडविण्यासाठी ठोस पावले उचलण्यात आली आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील पर्यायी रस्त्यांसह उड्डाणपुलाचे सुमारे ६५० कोटी रुपयांचे काम हाती घेतले आहे. यामुळे भविष्यात आयटी पार्कमधील प्रवास जलद होण्यास मदत होणार आहे.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये सध्या अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्यातील काही प्रकल्पांना एमआयडीसीने गती दिली आहे. हिंजवडीतील लक्ष्मी चौकात वारंवार वाहतूक कोंडी होती. ही कोंडी सोडविण्यासाठी या चौकात उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल चारपदरी आणि ७२० मीटर लांबीचा असेल. त्यासाठी ४० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. या पुलासाठीच्या निविदा मागविण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे लवकरच या पुलाचे काम सुरू होणार आहे, अशी माहिती एमआयडीसीतील सूत्रांनी दिली.

हिंजवडीतील शिवाजी चौक ते स्मशानभूमी या रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. हा रस्ता ९०० मीटर लांबीचा आहे. हा रस्ता सहापदरी केला जाणार आहे. यासाठी २४.७४ कोटी रुपये खर्च येणार आहे. याचबरोबर आयटी पार्कमधील टप्पा एकपासून टप्पा तीनला जोडणारा नवीन रस्ता बांधला जाणार आहे. हा रस्ता ५ किलोमीटर लांबीचा असेल आणि त्यासाठी ५८४.१४ कोटी रुपये खर्च येईल. या दोन्ही रस्त्यांच्या जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहेत. याचबरोबर काही भूसंपादन करावे लागणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग ही जागा संपादित करून एमआयडीसीला देणार आहे. त्यानंतर या दोन्ही रस्त्यांची कामे सुरू होतील, असे सूत्रांनी सांगितले.

बाणेरला थेट आयटी पार्कशी जोडणाऱ्या रस्त्याचे काम सुरू आहे. हा रस्ता सहापदरी असून, एकूण ५.७५ किलोमीटर लांबीचा आहे. यातील २.५ किलोमीटर रस्त्याचे काम झाले असून, उरलेले ३.२५ किलोमीटरचे काम पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) नगररचा योजनेला (टीपी स्कीम) मंजुरी मिळाल्यानंतर सुरू होईल. तसेच, सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आयटी पार्कमध्ये ३०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत आहेत. त्यातील २८० कॅमेरे बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे, असेही सूत्रांनी नमूद केले.

## डी मार्ट समोर वर्दळीच्या ठिकाणी 5 राऊंड फायर करून दुक्कल फरार

**नवी मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील सानपाडा स्टेशननजीक दुचाकीवरून आलेल्या युवकांनी एका व्यक्तीवर अंधाधुंद गोळीबार केला. एकूण पाच गोळ्या झाडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकरणी पोलीस घटनास्थळी पोहोचले असून तपास सुरु आहे. जखमी व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही.

सानपाडा रेल्वे स्टेशनबाहेरील डी मार्टनजीक सकाळी दहाच्या सुमारास हा प्रकार घडला. दुचाकीवरून दोन व्यक्ती आल्या त्यांनी गाडी थांबवत पाच गोळ्या झाडल्या. यात एक व्यक्ती जखमी झाला असून त्याला रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. ही घटना ज्या याठिकाणी घडली तो परिसर कायम गर्दी असणारा आहे. अशा गर्दीतून गोळ्या झाडणारे आपली दुचाकी सुसाट वेगाने काढून पसार झाले.

ही माहिती मिळताच सानपाडा पोलीससह वरिष्ठ पोलीस अधिकारी घटना स्थळी दाखल झाले आहेत. परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त पंकज दहाणे यांनी घटनेला दुजोरा आहे. गोळ्या झाडणारे नेमके कुठल्या दिशेने आणि कुठे पळाले याचा तांत्रिक शोध घेणे सुरु आहे तसेच चारही दिशेला पथके रवाना झालेली आहेत. जखमी व्यक्तीवर उपचार सुरु आहेत. पाच गोळ्या झाडल्याची प्राथमिक माहीती प्राप्त झाली आहे. जखमी व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही.

## सिडकोची अनधिकृत बांधकामांवर सन 2024 मध्ये प्रभावी कार्यवाही

# 2,102 अनधिकृत बांधकामांचे निष्कासन

# 2 लाख चौ.मी. हून अधिक क्षेत्र केले अतिक्रमणमुक्त

**नवी मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**



विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली, सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या नेतृत्वाखालील नियंत्रक अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई व नैना) विभागा तर्फे सन 2024 मध्ये सिडको अधिकारक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांविरुद्ध धडक मोहिमा राबवून 2,102 अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली व 2,06,431 चौ.मी. क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले. नवी मुंबईसारख्या सुनियोजित शहराच्या विकासामध्ये अडथळा ठरणारी व शहराला विद्रुपीकरण करणारी अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही सिडकोतर्फे नियमितपणे पार पाडण्यात येते.

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने सन 2024 या वर्षामध्ये 547 निष्कासन मोहिमांचे आयोजन करून 302 यशस्वी मोहीमांदरम्यान सिडको संपादित जमिनींवरील 2,102 अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे निष्कासित केली. निष्कासित करण्यात आलेल्या बांधकामांमध्ये कच्ची बांधकामे, आरसीसी बांधकामे, टपऱ्या इ. समावेश होता. निष्कासन कारवाई करण्यापूर्वी 2,160 अनधिकृत बांधकाधारक/अतिक्रमणधारकांना एमआरटीपी अंतर्गत नोटीसा बजावून बांधकाम निष्कासित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. या मोहींमादरम्यान नवी मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्थानकांतील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी वेळोवेळी योग्य तो पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून दिला.

नवी मुंबई क्षेत्रामध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू (एमटीएचएल), उलवे सागरी मार्ग, नवी मुंबई मेट्रो, सिडकोचे गृहनिर्माण प्रकल्प विकसित करण्यात आले असून व इतर पायाभूत सुविधा प्रकल्प नियोजित किंवा प्रगतीपथावर आहेत. या पार्श्वभूमीवर, नवी मुंबईचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील लौकिक अधिक वृद्धींगत होत असताना अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामांमुळे शहराच्या विकासाला बाधा येऊ नये याकरिता अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामांविरुद्ध आयोजित करण्यात येणाऱ्या या मोहिमा महत्त्वाच्या ठरतात.

निष्कासन मोहिमांव्यतिरिक्त, नागरिकांना सावध करण्याकरिता सिडकोतर्फे अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटीसा वेळोवेळी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येतात. तसेच नागरिकांनी नवी मुंबई किंवा नैना क्षेत्रामध्ये सदनिका किंवा दुकाने खरेदी करताना संबंधित बांधकामाबाबतची कागदपत्रे तपासावीत व संभाव्य आर्थिक फसवणूक टाळावी, असे आवाहनही सिडकोतर्फे करण्यात येत आहे.

## 'राष्ट्रवादी भवन' नामफलकाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते अनावरण




**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश कार्यालयाच्या नामफलकाचे अनावरण प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते आज करण्यात आले.

'राष्ट्रवादी भवन' नावाने या कार्यालयाचे अनावरण करण्यात आले. यावेळी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार इद्रीस नायकवडी, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष महेंद्र पानसरे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, सामाजिक सेलचे प्रदेशाध्यक्ष सुनिल मगरे, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, महिला नेत्या सुरेखाताई ठाकरे, प्रदेश प्रवक्त्या वैशाली नागवडे, युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे, मुंबई कार्याध्यक्षा मनिषा तुपे, दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्षा पुजा पवार आदींसह पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी**

राष्ट्रवादी भवनमध्ये प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोकरा योजनेसाठी निफाडच्या 33 गावांची निवड

**विंचूर |** महाराष्ट्र राज्याच्या कृषी विभागाकडून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) योजनेसाठी नाशिक जिल्ह्यातील ५३२ गावांची तर निफाड तालुक्यातील ३३ गावांची निवड झाली आहे. यामुळे निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

शेती आणि शेतीशी निगडित बाबींच्या विकासासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) योजना जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत आहे. ही योजना राज्यात इतर जिल्ह्यांत यशस्वी झाल्याने नाशिक जिल्हा या योजनेत समावेश करण्याची मागणी होत होती. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या मान्यतेने या योजनेत नाशिक जिल्ह्याचा सामावेश केला आहे. या योजनेतून शेती विषयक नवीन संशोधनाचा उन्नत शेतीसाठी उपयोग, पाण्याचा कार्यक्षम वापर वाढविण्यासाठी उपाययोजना व त्यायोगे शेतीमधील कर्ब उत्सर्जन कमी करणे, शेतीमध्ये कर्बग्रहण वाढवून शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिट सुविधा उपलब्ध करण्यास साहाय्य करणे, संवर्धित व पुनरुज्जीवित या हवामान शेती पद्धतीचा वापर करून पिकांची उत्पादकता वाढविणे, पौष्टिक तृणधान्य उत्पादनावर भर देणे, हवामान अनुकूल तंत्रज्ञानासाठी विविध संशोधनसंस्थांबरोबर भागीदारी करणे इत्यादी घटकांचा समावेश राहील, अशी माहिती कृषी सहाय्यक आर.एन. शिंदे यांनी दिली.




### नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प म्हणजेच पोकरा योजना

शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास चालना देणे हेच या योजनांचे उद्दिष्टे आहे. वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था किंवा कंपनी, बचत गटांसाठी या योजनेअंतर्गत विशेष अर्थसहाय्य आहे. तसेच विविध उपक्रमांसाठी या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदान रुपी लाभ दिला जातो.

### निफाड तालुक्यातील गावे

रेडगाव, नांदूर खु., सावरगाव, रानवड, खेडे, सारोळे खुर्द, ब्राह्मणगाव वनस, टाकळी (विंचूर), विठ्ठलवाडी, सुभाषनगर, विष्णूनगर, विंचूर, निमगाव वाकडा, ब्राह्मणगाव (विंचूर), वेळापूर, पाचोरे खुर्द, हनुमाननगर, गोळेगाव, डोंगरगाव, दहेगाव, भरवस, नांदगाव, धानोरे, कोळगाव, रुई, देवगाव, महादेवनगर (एन. वी.), मनोरी खुर्द, वाकद, शिरवाडे (वाकद), कानळद, चाटोरी, सावळी.



# स्वामीनारायणच्या विद्यार्थ्यांनी फडकवला श्रीरामाचा भगवा !

## वार्षिक स्नेहसंमेलनात रामायणाची अनुभूती

**नाशिक |** भगवान श्रीराम म्हणजे करुणा, त्याग आणि समर्पणाची सगुण मूर्ती. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्रांचा आदर्श प्रत्येक विद्यार्थ्याने घ्यावा. धर्म, सत्य, मर्यादा, आदर्श आणि कर्तव्यांचा महत्त्वपूर्ण संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचावा हा व्यापक उद्देश स्नेहसंमेलनात सफल झाला. यावेळी 'सबके अपने राम' ही संकल्पना साकारण्यात आली. वार्षिक स्नेहसंमेलनात संपूर्ण रामायणाची अनुभूती विद्यार्थी, पालक व उपस्थितांना मिळाली.

काल (दि.२) श्री स्वामीनारायण इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय भक्तिमय वातावरणात झाले. शाळेचे विश्वस्त परमपूज्य ज्ञानपुराणी स्वामी यांच्या जन्मदिनाच्या औचित्त्याने स्वामीनारायण पंथाचे अनेक संत, महंत यांनी उपस्थित राहून त्यांचे अभिष्टचिंतन केले व शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. अयोध्येला राम मंदिर व्हावे हे प्रत्येक भारतीयाचे स्वप्न गेल्यावर्षी प्रत्यक्षात साकार झाले. भगवान श्रीरामांच्या जीवनचरित्र उलगडून महत्त्वपूर्ण संदेश नृत्यनाट्यातून देण्यात आला.

असंख्य विद्यार्थ्यांनी रामायणातील काही प्रसंग हुबेहूब सादर केले. त्यात अयोध्या राम मंदिर, राम जन्म, सीता स्वयंवर, राम सीता भेट, भरतभेट, शूर्पणखा व मारीच वध, सीता हरण, शबरी भेट, हनुमानाची भक्ती, वाली वध, सेतुबंध, लंकेवर हल्ला, राम रावण युद्ध, रावण वध, माता सीतेची अग्निपरीक्षा, रामराज्याभिषेक सोहळा या प्रसंगांचे सुंदर सादरीकरण केले. की जो केसरी के लाल, हे गजवदना,भगवा रंग, जो राम को लाये या सुमधुर गाण्यांनी वातावरण मंगलमय झाले. रामायणातील सर्व महत्त्वाची पात्रे विद्यार्थ्यांनी साकारली.

कार्यक्रमास प्रशासक माधव प्रकाश स्वामी, मुख्याध्यापिका अस्मिता पटेल यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी स्वामीनारायण पंथाचे केपी स्वामी, कपिल स्वामी, हरीसेवक स्वामी, केशवपुराणी स्वामी, अमृत स्वामी, कुंज स्वामी, भक्ती किशोर स्वामी, स्वामीनारायण ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सौ.अश्विनी अत्रे व सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते.

# भाजपातर्फे लासलगावात सदस्य नोंदणी अभियान

**विंचूर |** भाजपा निफाड तालुका लासलगाव मंडल विभागाच्या वतीने संघटना पर्व सदस्य नोंदणी अभियान २०२५ कार्यशाळाचे आयोजन भाजप नाशिक जिल्हा उत्तर जिल्हा अध्यक्ष शंकरराव वाघ लासलगाव मंडल प्रभारी आनंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यात कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी सदस्यता नोंदणी मोठ्या प्रमाणात करावी जेणेकरून आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका भाजप स्वबळावर तसेच ताकतीने लढवू यासाठी इच्छुक उमेदवार यांनी कामाला लागावे असे आव्हान मंडल अध्यक्ष निलेश सालकडे यांनी केले आहे.

यावेळी मंडल अध्यक्ष निलेश सालगडे, जिल्हा सरचिटणीस सुवर्णाताई जगताप, वाल्मीक गायकवाड, राजू राणा किरण कुलकर्णी, राजाभाऊ चाफेकर स्मिता कुलकर्णी ,भारती महाले नवनाथ जाधव, अभिषेक घोटेकर उत्तम नागरे, गणेश फड ,गोरख सोनवणे धनंजय गांगुडे, रवी होळकर संजय गडाख, सुनील नेवगे ,भाऊ कल्याणकर मनीषा हरळे, योगिता आंबेकर ,तसेच सर्व बुथ प्रमुख व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# युवा सेना घोटी शहर प्रमुखपदी घोरपडे यांची नियुक्ती

**इगतपुरी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने, खासदार श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार, भाऊसाहेब चौधरी यांच्या आदेशाने व शिवसेना उपनेते तथा संपर्कप्रमुख विजय आप्पा करंजकर यांच्या प्रमुख उपस्थितीत, उपजिल्हा प्रमुख मोहन बऱ्हे, युवा सेना तालुका प्रमुख विनोद भागडे, शिवसेना शहर प्रमुख भूषण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली घोटी शहर युवा सेना शहर प्रमुखपदी विनायक विष्णु घोरपडे यांची निवड करण्यात आली.

त्यांच्यावर पक्षाची विचारधारा ध्येयधोरणे तळागाळात पोहचविण्याची आणि पक्षवाढीची जबाबदारी सोपविण्यात आली असून त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. पक्ष संघटन वाढवण्यासाठी व पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी प्रयत्न करणार अशी ग्वाही युवा सेनेचे विनायक घोरपडे यांनी दिली. या प्रसंगी शिवव्याख्याते विकास शिरसाठ, सूरज जाधव,प्रतीक जाधव, तन्मय पवार, हिरामण चव्हाण, रोहन गतिर, कृष्णा आरोटे, करण आडोळे, ऋषी जाधव, आदी शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाचनाने माणसं घडतात : प्राचार्य डॉ. वाघ

**देवळाली कॅम्प ।** मानवी जीवनामध्ये स्वतःला आकार देण्यासाठी ग्रंथांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. प्रत्येकाने जीवनामध्ये वाचन केले पाहिजे ग्रंथांमध्ये जीवनाच्या अनुभूती असतात.वाचनाने माणसे घडतात असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. प्रतिमा वाघ यांनी वाचन कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी केले.

महाराष्ट्र शासनाच्या वाचन संकल्प उपक्रमांतर्गत आयोजित सामूहिक वाचन व वाचन कौशल्य कार्यशाळे प्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर सुभाष वाचनालय विहित गावचे अध्यक्ष कैलास हांडोरे, शिवाजी हांडोरे, संदीप डुंबरे, कवी शिवाजी पगार, महेंद्र पांगारकर, श्रीकांत हांडोरे, पोपटराव पोरजे, अमर जमदाडे, दिनेश हांडोरे, लता हंटांडोरे, समन्वयक उपप्राचार्य प्रा. डॉ. दिलीप जाधव, प्रा. सविता आहेर, प्रा. सतीश कावळे, प्रा. संजय पाटील आदी उपस्थित होते.



महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमांतर्गत मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्रीमती विमलाबेन खिमजी तेजूकाया कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालय देवळाली कॅम्प व सुभाष वाचनालय व ग्रंथालय विहितगाव यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात सामूहिक वाचन आणि वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ.प्रतिमा वाघ यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

या कार्यशाळेत सुप्रसिद्ध मराठी कवी शिवाजी पगार यांनी वाचनाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले वाचनाशिवाय मानवी जीवनाचा विकास नाही व्यक्तिमत्व विकासाकरता प्रत्येकाने वाचले पाहिजे. आजच्या आधुनिक युगात वाचनाकडे कल कमी होताना दिसत आहे. यानंतर पांगारकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, वाचनाने माणसाला विवेक बुद्धीची जाणीव होते.

जीवनाबद्दलचा दृष्टिकोन सापडतो. वाचनाने ऐतिहासिक गोष्टीतून प्रेरणा मिळते. त्या प्रेरणेने जीवनाचा रस्ता सोपा होतो आणि माणसाचा शाश्वत विकास होतो. सामाजिक जीवन सुव्यवस्थित राहते. सामाजिक बांधिलकीची जाणीव होते आणि सर्वांगीण विकासाला चालना मिळते.

शिवाजीराव हांडोरे यांनी याप्रसंगी मार्गदर्शन केले. ते म्हणाले वाचन ही मानवी जीवनाला एक देणगी आहे. माणूस वाचत गेला की, माणसं वाचायला शिकतो. साहित्यातून समाज जीवनाची सुखदुःख प्रतिबिंबित होतात. ती सुखदुःखे का निर्माण झाली याची कारणमीमांसा वाचनामुळे होते आणि जगण्याचा आत्मविश्वास ग्रंथातून निर्माण होतो, असे महत्त्वाचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक या कार्यशाळेचे समन्वयक उपप्राचार्य प्रा. डॉ.डी.टी. जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकातून वाचनाचे महत्त्व विशद करून वाचनासारखे दुसरी दौलत नाही. ती दौलत निर्माण करण्यासाठी माणसाने आयुष्यभर काही ना काही वाचत असं राहिले पाहिजे. खरी जीवन शिदोरी गग्रंथांमधून आहे. तरुणपणात वाचल्याने माणसाला ध्येय निश्चिती करणे आणि जीवन जगणं सोपं जात म्हणून विद्यार्थ्यांनी वाचनाकडे वळाले पाहिजे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सविता आहेर यांनी केले तर आभार प्रदर्शन कैलास हांडोरे यांनी केले. या कार्यक्रमास प्रा. पवार, प्रा. सोमासे,प्रा. देशमुख, प्रा. नाठे, प्रा. गवळी आदींसह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# पहिल्या राज्यस्तरीय लॅक्रोस स्पर्धेत नाशिकची बाजी

**नाशिक (प्रतिनिधी) |** सेलु, परभणी येथे महाराष्ट्र लॅक्रोस असोसिएशनच्या मान्यतेने आणि परभणी जिल्हा लॅक्रोस असोसिएशनच्या वतीने पहिल्या सब जुनिअर आणि वरिष्ठ गट महिला-पुरुष यांच्या महाराष्ट्र लॅक्रोस अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांच्या संघांनी उपस्थिती नोंदवली. या स्पर्धेत नाशिक जिल्ह्याच्या वरिष्ठ गट पुरुष संघाने आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकाविला. या खेळाच्या कौशल्यामुळे नाशिकच्या खेळाडूंचे संपूर्ण महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्रात कौतुक करण्यात येत आहे.



लॅक्रोस या खेळाचा २०२८ च्या ऑलिंपिक स्पर्धेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. या ऑलम्पिक स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी सहभागी व्हावी यासाठी लॅक्रोस फेडरेशन ऑफ इंडियाचे पदाधिकारी विशेष प्रयत्न करत आहेत. या पहिल्याच स्पर्धेत आपल्या जिल्ह्याची छाप पाडणाऱ्या नाशिकच्या खेळाडूंचे कौतुक फेडरेशनचे तौसीफ लारी यांनी केले. खेळ नवीन असून देखील अतिशय अल्प कालावधीत खेळ आत्मसात करून आपल्या क्रीडा कौशल्याने खेळात सर्व जिल्हा संघांना मात देत अंतिम फेरीत परभणीला २-० ने नमवून नाशिक संघाने बाजी मारली. त्यामुळे महाराष्ट्र असोसिएशनचे सचिव डॉक्टर मोहम्मद बाबर, परभणी जिल्हा सचिव प्रशांत नाईक, धुळे जिल्हा सचिव विशाल पवार यांनी देखील खेळाडूंचे पाठीवर शाबासकीची थाप दिली.

खेळाडूंचे नाशिक येथे आगमन होताच नाशिक जिल्हा संघटनेचे अध्यक्ष आनंद खरे आणि जिल्हा सरचिटणीस दीपक निकम-पाटील यांनी खेळाडूंचे पुष्प पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देत खेळाडूंचे स्वागत केले आणि अभिनंदन केले. याचप्रमाणे नाशिक पूर्वचे क्रीडाप्रेमी आमदार राहुल ढिकले यांनी संघटनेचे पदाधिकारी आणि खेळाडू यांना भेटून शुभेच्छा दिल्या आणि अशा पद्धतीने क्रीडा विश्वात नाशिक जिल्ह्याचे नावलौकिक करत रहा, आम्ही कायम खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी तत्पर असल्याचे आश्वासन दिले. यावेळी जिल्हा लॅक्रोस असोसिएशनचे अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार विजेते आनंद खरे, सचिव दीपक निकम-पाटील आदी मान्यवर देखील यावेळी उपस्थित होते त्याचबरोबर भारतीय जनता पार्टीचे पूर्व विधानसभा सरचिटणीस सुनील केदार यांनी देखील खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. नाशिक जिल्ह्याच्या संघात स्वप्निल कातकाडे, संदेश राठोड, अनिश वाघमारे, ऋषिकेश भवर, मयूर वाळदे, राधेमोहन आहेर, लखन साळवे, जयपाल जाधव, शशीभूषण सिंग, नोमन शेख, वैभव वानखेडे, साईनाथ दराडे, संघ मार्गदर्शक अविनाश वाघ यांचा समावेश होत. याच प्रमाणे या विजयी खेळाडूंना चंद्रकांत बनकर , योगेश नाटकर-पाटील, दीपक पाटील, अशोक कदम , सोमनाथ वडजे, राजू थोरात, अविनाश वाघ आदींनी शुभेच्छा दिल्या.

## महत्त्वाचे



### कळसुबाई शिखरावर नवीन वर्षाचे स्वागत; गिर्यारोकांचा उपक्रम

**इगतपुरी :** महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसुबाई पर्वतशिखर हे ट्रेकिंग करिता अतिशय प्रसिद्ध आहे. घोटी शहरातील कळसुबाई मित्र मंडळाचे गिर्यारोहक मराठी नूतन वर्ष असो, की ग्रेगोरिन कॅलेंडरनुसार इंग्रजी नवीनवर्ष असो, त्या नूतन वर्षाचे स्वागत महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसुबाई शिखरावर सातत्याने अठ्ठावीस वर्षांपासून परंपरा समजून साजरा करतात. तसेच नवरात्रीत रोज नऊ दिवस कळसुआईची मनोभावे सेवा करतात. सालाबादप्रमाणे या इंग्रजी नवीन वर्षाच्या प्रथमदिनी देखील कळसुबाई मित्र मंडळाच्या गिर्यारोहकांनी राज्यातील सर्वोच्च कळसुबाई शिखरावर ब्रम्हमुहूर्तावर पहाटेच चढाई करून सूर्योदयच्या सोनेरी किरनांमध्ये शिखरस्वामीनी कळसुबाई मातेचा पंचामृताने अभिषेक, पूजन व आरती करून भक्तिभावाने सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचे स्वागत केले. या नव्याच्या आरंभाची गोड सुरुवात करण्याच्या निमित्ताने मंडळाच्या गिर्यारोहकांनी वर्षभर कळसुबाई शिखर आणि जिल्ह्यातील गडकिल्ल्यांवर स्वच्छता अभियान राबवून ऐतिहासिक अमूल्य ठेवा हा प्लास्टिक मुक्त ठेवायचे, असा संकल्प सर्व मंडळाच्या गिर्यारोहकांनी केला. तसेच गिर्यारोहकांच्या वतीने देशाचे माजी पंतप्रधान स्वर्गीय डॉ मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी कळसुबाई मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भगीरथ मराडे, काळू भोर, निलेश पवार, प्रवीण भटाटे, सोमनाथ भगत, डॉ. महेंद्र आडोळे, संजय शेवाळे, गोकुळ सूर्यवंशी, भागीरथ म्हसने, नितीन भागवत, नामदेव जोशी, चेतन जोशी, देविदास पाखरे, संदीप परदेशी, बाळु आरोटे, अशोक हेमके, उमेश दिवाकर, जनार्दन शिंदे, गुरुनाथ आडोळे इतर शेकडो ट्रेकर्स सहभागी झाले होते.



### कोस्ट टू क्रिस्ट ८३० की.मी. रेसमध्ये नाशिक सायकलिस्टची अफलातून कामगिरी

**नाशिक ।** कोस्ट टू क्रिस्ट रेस कलकत्ता येथील बंगालचा उपसागर दिघा येथून सुरू होऊन धूम, दार्जिलिंग येथे भारतातील सर्वोच्च 5800 मीटर उंचीवरील रेल्वे स्टेशनवर समाप्त होते. दार्जिलिंगचे अतिशय चढाईचे 70 किलोमीटर डोंगर घाट व झिरो डिग्री पेक्षा कमी तापमानामध्ये हाडे गोठवणाऱ्या थंडीचा सामना करत या रेससाठी नाशिक मधून 16 सायकलिस्टने सहभाग नोंदवला. त्यात सात सायकल वीरांनी दिलेल्या वेळेच्या आत आव्हानात्मक 830 की. मी .राईड पूर्ण करून रेस अक्रॉस अमेरिका (रॅम) या स्पर्धेसाठी पात्र ठरले. सायकलिस्ट बजरंग कहाटे, रामदास सोनवणे, योगेश शिंदे, प्रशांत भावसार, विजय काळे, सुरज देशमुख, भास्कर वाघ हे रॅम क्वालिफायर झाले. सिन्नर सायकलिस्टसचे योगेश शिंदे यांनी देशभरातून आलेल्या स्पर्धकांमध्ये दुसरा क्रमांक पटकावला. हवामानातील बदलांना सामोरे जात नाशिकच्या सहा सायकलपटूंनी यशस्वीपणे स्पर्धा पूर्ण केली. त्यात मोहिंदरसिंग भराज, पंकज कुमार पाटील, दत्तात्रय चकोर, लुकेश भोंगडे, मुस्तफा टोपीवाला, लितेश येवले यांनी ही राईड यशस्वीपणे पूर्ण केली. हवामानातील अडचणींवर मात करत अध्यक्ष किशोर काळे, नानासाहेब पवार, योगेश भामरे यांनी अवघे 180 की.मी. अंतर राहिले होते, परंतु काही कारणास्तव राईड क्युट केली. नाशिकचा झेंडा दार्जीलिंग पर्यंत सर्व सायकलिस्ट यांनी पोहोचवला. रॅम क्वालिफायर बजरंग कहाटे, रामदास सोनवणे, योगेश शिंदे, प्रशांत भावसार, विजय काळे, सुरज देशमुख व भास्कर वाघ यांचे अभिनंदन होत आहे. या राईडसाठी रॅम विजेते डॉ. महेंद्र महाजन यांचे मार्गदर्शन लाभले.

### पंतप्रधानांचे बंधू पंकज मोदी त्र्यंबकेश्वराच्या दरबारात

**त्र्यंबकेश्वर ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धाकटे बंधू पंकज मोदी यांनी येथे भेट देत त्रंबकेश्वराचे दर्शन घेतले. येथील युवा पुरोहित अमित जयप्रकाश देवकुटे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्रंबकेश्वरला भेट द्यावी, यासाठी पंकज मोदींना पंतप्रधानांना निरोप देण्याची विनंती केली. नाशिकच्या प्रसिद्ध कैलास मठाचे स्वामी सवितानंद सरस्वती महाराज हे पंकज मोदी यांच्या समवेत होते. ज्योतिर्लिंग त्रंबकेश्वर मंदिर गर्भगृहात जाऊन पंकज मोदी व स्वामीजींनी अभिषेक केला. पूजा पौरोहित्य जयप्रकाश देवकुटे यांनी केले. त्र्यंबकेश्वर मध्ये २०२६ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा असल्याने पुन्हा त्र्यंबकेश्वरला येण्याचे पंकज मोदी यांना निमंत्रण देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्र्यंबकेश्वरला भेट देण्याची विनंती करावी असे सुचवले. मंदिर ट्रस्टच्या वतीने देखील स्वागत करण्यात आले. यावेळी महंत सत्यप्रकाश ब्रह्मचारी, श्रीदेव त्रिपाठी, शिवाजी डोळे, अरविंदजी हे उपस्थित होते.



### रोहिले बुद्रुक शिवारात निळ्या ध्वजाची विटंबना

**नांदगाव ।** नाशिक जिल्ह्याच्या नांदगाव तालुक्यातील बोलठाण पासून पाच ते सहा किलोमीटर अंतरावरील रोहिले बुद्रुक शिवारात असलेल्या शिवराणा हॉटेल जवळ खामगाव येथील लोकांनी गाडीला लावलेला निळा ध्वज फाडून विटंबना केली. जातेगाव येथील बौद्ध समाजाचे नागरिक भीमा कोरेगाव येथे शौर्य दिनाच्या निमित्ताने अभिवादन करण्यासाठी जात असताना ही घटना घडली. नांदगाव पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. रात्रीच चार आरोपींना अटक करण्यात आली असून दोन आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथील बौद्ध समाजाचे लोक ३१ डिसेंबर रोजी मंगळवारी भीमा कोरेगावच्या एक जानेवारी शौर्य दिनानिमित्ताने अभिवादन करण्यासाठी जात असताना हा प्रकार घडला. गाडीमधील सुरू असलेल्या टेपमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गाणे बंद करा, असे म्हणत हल्ला केला. त्यामुळे येथे वातावरण चिघळले. सदरच्या घटनेची माहिती नांदगाव पोलीस स्टेशनच्या निरिक्षक प्रीतम चौधरी यांना समजताच पोलीस हवालदार भास्कर बस्ते यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी वातावरण शांत करत तपासाची चक्रे सुरू केली. या घटनेबाबत नांदगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून संशयितांना रात्री उशिरापर्यंत अटक करण्यात आली आहे. दोन अज्ञात आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथील कुंभमेळ्याला सुरूवात होत आहे. केवळ देशातूनच नव्हे तर विदेशातून कोट्यवधी भाविक येथे येतात. कुंभमेळ्यासारख्या विशाल आयोजनातील आव्हानांना ओलांडून केवळ चार महिन्यांत उत्कृष्ट असे सुविधांयुक्त शहर वसवण्यात आले आहे. या ठिकाणी ५० दिवस सहभागी होणाऱ्या ४० कोटी भाविकांची गैरसोय होऊ नये, असा त्यामागील उद्देश आहे.

-----------------

या महाआयोजनासाठी आधुनिक व्यवस्थापनातील धडे गिरवण्यात आले. सर्वात मोठी बाब म्हणजे काम वेळेवर सुरू करणे. अडचण येत असल्यास बुलडोझरसारखी शक्ती वापरणे. उदाहरणार्थ- रस्ते रुंदीकरणामध्ये तसे झाले. प्रत्येक व्हर्टिकलकडून दररोज फीडबॅक घेतानाच आढावा घेतला गेला. त्यामुळे समस्या समजू शकली. मोठ्या प्रकल्पांत हे गरजेचे असते.

सगळे अधिकारी रात्री २ वाजेपर्यंत कुंभमेळ्यात असतात. बैठका घेतात. त्यामुळे टीममध्ये उत्तरदायित्वाची भावना राहते. काम कसे पूर्ण होईल, यावर नव्हे तर ते कोण उत्कृष्टपणे करू शकेल, यावर लक्ष केंद्रित केले जाईल. म्हणजेच गुणवत्तेशी तडजोड नाही. त्याशिवाय शहराला आधुनिक सुविधांशी जोडताना लाखो कर्मचाऱ्यांमध्ये अभिमानाची भावना असावी यावर लक्ष दिले गेले.

कारण प्रत्येक कर्मचाऱ्याला आपल्या कामाचा अभिमान असेल तर तो अशक्य वाटणारे कामही शक्य करू शकेल. कुंभमेळ्यातील हजारो स्वच्छता कामगार, नाविकांपासून अभियंत्यांपर्यंत ही अभिमानाची भावना दिसून येते. त्यातूनच मोठे उद्दिष्ट साध्य होऊ शकले.

**तीन लाख चष्मे देण्याची तयारी**

कुंभमेळ्यात नेत्र रुग्णालयही उभारले जात आहे. मेळा प्रशासनानुसार हे जगातील सर्वात मोठे अस्थायी रुग्णालय असेल. येथे ४५ दिवसांत पाच लाख मोतीबिंदूंची शस्त्रक्रिया होईल. ३ लाख गरीबांना चष्म्यांचे वाटपाची तयारी आहे.

अशा प्रकारचे सेटअप तयार करणे, दोन महिन्यानंतर ते हटवणे आणि यंत्रे आपपल्या ठिकाणी पोहोचवणे ही मोठी लॉजिस्टिक प्रकारातील कवायत म्हटली पाहिजे. हे काम अगदी अचूकपणे साध्य करणे मोठे आव्हानात्मक आहे.

**दूरसंचार दुरुस्ती :** ३० लाख मोबाइल ठेवून देखील कुंभमधील मोबाइल व्यवस्था नेहमी अयशस्वी राहिली. त्यामुळेच सहकारी वॉकी-टॉकीद्वारे सदैव संपर्कात राहण्याचा सराव करत आहेत. म्हणजे हातून काही निसटू नये.

कामाची वेळ पाहिल्यास येथे लोक १५-१५ तास काम करत आहेत. सुट्टी, ओव्हरटाइम, टीए-डीए यांची त्यांना चिंता नाही. सेवा करून त्यांना व कुटुंबाला अमर्याद असे पुण्य मिळेल, अशी त्यांची भावना आहे.

पिण्याचे पाणी, सांडपाण्यासारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. पंचतारांकित डोम, गरजूंना डॉरमेट्री आहे. अस्थायी शहर एवढ्या कुशलतेने चालू शकत असल्यास स्थायी शहरात असे का होत नाही? असा विचार मनात येतो. म्हणूनच अस्थायी शहराला कुंभमेळा विद्यापीठ म्हटले तर वावगे नाही.

सुंदरकांडमध्ये एक पद आहे..

# महाकुंभ!



*विनय न मानत जलधि*
*जड़ गए तीन दिन बीति,*
*बोले राम सकोप तब*
*भय बिनु होय न प्रीति...।*

त्याचा अर्थ, स्तुतीनंतरही समुद्राने श्रीरामांना मार्ग दिला नाही तेव्हा संतापून श्रीराम म्हणाले, हे लक्ष्मण हा मूर्ख सागर विनयाची भाषा जाणत नाही. काही लोक भीतीविना प्रेम समजू शकत नाहीत, अगदी तसेच हे आहे.

यावरून बोध घेऊन सीईओ म्हणजे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी प्रयागराजमध्ये रस्ता चौपदरीकरण अभियान रोखणाऱ्यांवर कडक उपाययोजना केली.

येथे प्रत्येक प्रश्नावर तोडगा आहे. कारण अनेक शहरांना अशाच प्रश्नांना सतत तोंड द्यावे लागते. येथील प्रभावी व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांचे शांत वागणे या गोष्टी जाणून घेण्यासाठी उज्जैनचे एडीजी उमेश जोगा यांनी येथे भेट दिली. कारण पुढचा कुंभमेळा त्यांच्या शहरात होणार आहे.

गंगा नदीने या वेळी सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत जमीन सोडलेली नव्हती. हेच सर्वात मोठे आव्हान होते. म्हणूनच हा प्रकल्प ३० दिवस विलंबाने सुरू झाला. एवढे असूनही रेताड जमिनीला वाळवून समतल करण्यात आले. म्हणजे क्रेनच्या साह्याने कचरा हटवता येऊ शकेल.

केवळ चार महिन्यांत ३०० किमी लांबीचा रस्ता बांधण्यात आला. एक किमी लांबीचे पूल तयार केले गेले. हे पूल अवजड वाहतुकीसाठी गरजेचे आहेत. कारण आयोजनाला काही दिवस बाकी आहेत.

कर्मचाऱ्यांनी आता प्रकल्प पूर्ण करताना त्यात शॉर्टकट वापरता कामा नये. कारण सगळे दबावाखाली आहेत. दोन महिने ही ऊर्जा कायम राहावी यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे.

2013 वर्षी झालेला महाकुंभ आणि यावर्षी होत असलेल्या महाकुंभाची व्यवस्था यात खूप फरक आहे. सुविधा वाढल्या आहेत. कॅम्पमध्ये शौचालये, नळ आणि अन्य सुविधांमध्ये बराच बदल झाला आहे.

यावेळी सरकार 5 हजार कोटींपेक्षा जास्त खर्च करत आहे. मागील कुंभाच्या तुलनेत यावेळी 3 पटीने जास्त भाविक येणार आहेत. या संदर्भात जत्रेचा आकारही वाढवण्यात आला आहे. 40 चौरस किलोमीटर परिसर सुशोभित व चकाचक करण्यात येत आहे.

कुंभनगरची सुरक्षा अभेद्य किल्ल्यासारखी मजबूत करण्यात आली आहे. कुंभनगरीच्या मास्टर प्लॅनचे काम वेगाने सुरू आहे. कुंभमेळा सुरू होण्याच्या 20 दिवस आधीपासून गर्दीमुळे दीड किलोमीटर अगोदर बॅरिकेड्स लावून वाहने थांबवली जात आहेत, अशा पद्धतीने तयारी सुरू आहे.

●●●●●




# भारतीय सामाजिक कार्यकर्त्या!

## सिंधुताई सपकाळ पुण्यस्मरण विशेष



सिंधुताई सपकाळ या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्या विशेषतः भारतातील अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी ओळखल्या जातात. त्यांना नुकताच २०२१ मध्ये सामाजिक कार्य श्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या वेळोवेळी अनेक गौरवांच्या मानकरी ठरल्या. सिंधुताईंना सुमारे ७५० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांतील पद्मश्री पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार, मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार, आयटी प्रॉफिट ऑर्गनायझेशनचा दत्तक माता पुरस्कार, सोलापूरचा डॉ.निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार,राजाई पुरस्कार, शिवलीला महिला गौरव पुरस्कार, श्रीरामपूर अहमदगर जिल्हा येथील सुनीता कलानिकेतन न्यासातर्फे कै.सुनीता त्र्यंबक कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा सामाजिक सहयोगी पुरस्कार, सीएनएन- आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशनने दिलेला रिअल हीरो पुरस्कार, दैनिक लोकसत्ताचा सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार, प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार, डॉ.राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार, पुणे विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार आदींचा समावेश आहे.

सिंधुताईंचा जन्म आणि त्यांचे सुरवातीचे जीवन खडतर होते. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १९४७ रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे गावात आणि ब्रिटीश भारतातील बेरार येथील अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला.

एक अवांच्छित मूल असल्याने त्यांचे नाव चिंधी- फाटलेल्या कापडाचा तुकडा ठेवले. पण हीच चिंधी अनेक फाटक्या ठिगळांना जोडते, याचा त्यावेळी कोणी विचारही केला नसेल. अत्यंत गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लवकर लग्न यामुळे त्यांना चौथी इयत्ता उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा सोडावी लागली.

त्यांचे वयाच्या बाराव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी लग्न झाले, जे त्यांच्यापेक्षा तब्बल वीस वर्षांनी मोठे होते. लग्नानंतर त्या वध्यार्तील सेलू येथील नवरगाव गावात गेल्या. घरी प्रचंड सासुरवास होता.

कुटुंबात शैक्षणिक वातावरण नाही. जंगलात लाकूडफाटा, शेण गोळा करताना सापडलेले कागदाचे तुकडे माई घरी आणायच्या आणि उंदराच्या बिळांत लपवून ठेवायच्या. क्वचित घरी एकट्या असल्या तर त्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत.

अठराव्या वर्षापर्यंत माईंची तीन बाळंतपणे झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला. तेव्हा गुरे वळणे, हाच व्यवसाय असायचा. गुरेही शेकड्यांनी असायची. त्यांचे शेण काढता काढता बायकांचे कंबरडे मोडायचे. शेण काढून बाया अर्धमेल्या व्हायच्या. पण त्याबद्दल कोणतीही मजुरी मिळायची नाही.

रस्त्यावर मुरूम फोडणाऱ्यांना मजुरी, पण शेण काढणाऱ्यांना नाही. या शेणाचा लिलाव फॉरेस्टवाले करायचे. इथे सिंधुताईंनी बंड पुकारले आणि लढा सुरू केला. त्यामुळे या लिलावात ज्यांना हप्ता मिळायचा त्यांच्या हप्त्यावर गदा आली. हा लढा जिंकल्या पण त्यांना या लढ्याची जबर किंमत चुकवावी लागली.



श्रीकृष्णदास निरंकारी- बापू.
गडचिरोली.
९४२३७१४८८३

ताईंच्या या धैर्याने गावातील जमीनदार, दमडाजी असतकर दुखावला गेला होता. जंगलखात्याकडून येणारी मिळकत बंद झाली. दमडाजीने सिंधुताईंच्या पोटातील मूल आपले असल्याचा प्रचार सुरू केला. नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला आणि पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना त्याने बेदम मारून घराबाहेर काढले.

गुरांच्या लाथा बसून मरतील म्हणून तशा अर्धमेल्या अवस्थेत त्यांना गोठ्यात आणून टाकले. त्या अवस्थेत त्यांना कन्या जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही हाकलले. हे लग्न फार काळ टिकले नाही आणि वयाच्या वीसव्या वर्षीच त्यांना त्यांच्या मुलीसोबत नवऱ्याने सोडून दिले.

माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या, पण सख्ख्या आईनेही पाठ फिरवली. परभणी, नांदेड, मनमाड रेल्वे स्टेशनांवर त्या भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टावलेले एखादे फळ हाती लागेल, म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या.

एकदा जळगाव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. त्या दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. परंतु तेथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही.

स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनी २१ वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. दोन दिवस काहीच भीक मिळाली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांना तेथे कायम राहता येणार नाही. म्हणून शेवटी सिंधुताईंनी स्मशान गाठले.

अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. सन १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ही संस्था सुरू झाली.

आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. तेथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाऊ लागले. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जात असे.

शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते.

अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत. त्यांनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत त्या अशा- बाल निकेतन हडपसर, पुणे. सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा. अभिमान बाल भवन, वर्धा. गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा. ममता बाल सदन, सासवड. सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी आपल्या संस्थेच्या प्रचारासाठी आणि कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रदेशदौरे केले आहेत.

आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी आपल्या बोलण्याने आणि काव्याने समाजाला प्रभावित केले आहे. परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाउंडेशन संस्थेची स्थापना केली आहे. त्यांना महानुभाव पंथाचा अनुग्रह होता. महानुभाव पंथाच्या नियमाप्रमाणे त्यांना भूमीडाग देण्यात आला.

अशातच सिंधुताईंवर दि.२५ नोव्हेंबर २०२१ रोजी हॉस्पिटलमध्ये डायफ्रामॅटिक हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. त्यांच्यावर शस्त्रक्रियोत्तर काळजी घेण्यात येत होती. पाच वर्षांहून अधिक काळ ग्रस्त असलेल्या डायफ्रामॅटिक हर्नियामुळे त्यांचे डाव्या बाजुचे फुफ्फूस व्यवस्थितरित्या कार्य करीत नव्हते. शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रकृती थोडी बरी झाली होती.

तथापि, पाच दिवसांपूर्वी त्यांना फुफ्फुसाचा संसर्ग वाढल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडू लागली, त्यामुळे त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. दरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि दि.०४ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ८ वाजून १० मिनीटांनी त्यांचे निधन झाले.

पुणे येथील गॅलक्सी केर या दवाखान्यामध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. स्मृतिदिनी त्यांच्या ममत्वाला व कार्यकर्तृत्वाला मानाचा लवून मुजरा!!

■ ■ ■

# पाच राज्ये ओलांडून ईशान्येत पोहोचताहेत पाकची शस्त्रे



पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आता भारताच्या ईशान्येकडील राज्यांमध्ये अशांततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी जातीय वातावरण तापवण्यात गुंतली आहे. यासाठी आधुनिक शस्त्रास्त्रांची मोठी खेप पाकिस्तानमधून जम्मू, काश्मीर आणि पंजाबमार्गे ईशान्येकडील राज्यांमध्ये आणली जात आहे.

यासाठी बिहार राज्याचा वापर ट्रान्झिट मार्ग म्हणून आणि तस्करांसाठी शस्त्रे ठेवण्यासाठी केला जात आहे. अलीकडेच या संदर्भात गुप्तचर तपास यंत्रणांना काही माहिती मिळाली आहे.

गुप्तचर यंत्रणांना माहिती मिळाली आहे की, पाकिस्तानचे काही मोठे शस्त्रास्त्र तस्कर तस्करीच्या माध्यमातून जम्मू-काश्मीर आणि पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे पुरवत आहेत.

ही शस्त्रे येथून हरियाणातील गुप्त तळांवर, नंतर यूपी आणि बिहारमार्गे नेली जातात. मागणीनुसार नागालँड, मणिपूर आणि इतर ईशान्येकडील राज्यांना ही शस्त्रे पुरवली जात आहेत. पाकिस्तानचे काही मोठे शस्त्रास्त्र तस्कर जम्मू-काश्मीर आणि पंजाबमध्ये तस्करीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे पुरवत आहेत.

एनआयएने 5 राज्यांतील संशयास्पद ठिकाणी छापे टाकून शस्त्रे आणि रोख रक्कम जप्त केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. गुप्तचर यंत्रणांनी डार्क वेबवर पाकिस्तानातील काही शस्त्रास्त्रे तस्कर आणि भारतातील काही शस्त्रास्त्र तस्कर यांच्यातील संभाषण रोखले होते. यावरून ईशान्येकडील राज्यांमध्ये वातावरण बिघडवण्यासाठी अवैध शस्त्रे मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात असल्याचे समोर आले आहे. या शस्त्रांचे पेमेंट बिटकॉईनद्वारे करण्यात आले आहे.

●●●●●

# खराब हवेचा आरोग्यावर परिणाम

मुंबई आणि परिसराच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरायला लागली आहे. गेले काही दिवस मुंबई, नवी मुंबई आणि मुंबई उपनगर या ठिकाणच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरली आहे याचा दुष्परिणाम नागरिकांवर होऊ लागला आहे.

मुंबईच्या हवेत धुळीचे बारीक कण असल्याने त्याचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, वृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांवर होऊ लागला आहे. मुंबईत दम्याचे रुग्ण वाढू लागले आहेत त्यामागेही हेच कारण आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यात प्रामुख्याने वाढते औद्योगीककरण, वाहनांचे प्रदूषण, वाढती बांधकामे.

मुंबईत, रस्ते, मेट्रो, इमारती आदींचे बांधकामे सुरू असून त्यासोबतच वाहनांमधून उत्सर्जित होणारे कणही वातावरणात जमा होतात. हवेतील धूळ, कण आणि इतर प्रदूषण करणारे घटक पावसामुळे वातावरणातून बाहेर पडतात. पावसाळा संपला तरी हे कण हवेतच राहतात. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरण्यामागे देखील हेच कारणे आहेत.

मुंबईच्या हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने तज्ज्ञांची समिती नेमायला हवी. या समितीने मुंबईच्या हवेचा दर्जा कसा सुधारेल याचा अभ्यास करावा त्यासाठी या समितीला परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यावी लागली तरी सरकारने ती मिळवून द्यावी. कारण मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरणे म्हणजे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात येणे.

मुंबईकरांचे आरोग्य टिकवायचे असेल तर हवेच्या प्रदूषणावर ठोस उपाय करावाच लागेल. दिवाळी नंतर हे वायू प्रदूषण आणखी वाढेल असा इशारा तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरला. सरकारने दसरा, दिवाळी, नाताळ व नववर्षात वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांवर देखील बंदी घालावी. कारण फटाक्यांच्या प्रदूषणाने हवा आणखी खराब होते त्याचा दुष्परिणाम शेवटी मुंबईकरानांच भोगावा लागतो.




श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

चक्रीवादळ, मुसळधार पाऊस याची माहिती जशी एस एम एस ने दिली जाते तशी दुसऱ्या दिवसाच्या संभाव्य प्रदूषण पातळीची माहिती देता येईल . असे तंत्रज्ञान तयार करावे जेणेकरून नागरिक प्रदूषणापासून स्वतःचा बचाव करतील. मुंबईतील वाढत्या वाहनांवर देखील नियंत्रण आणावे, वाढत्या वाहनांमुळे देखील प्रदूषण वाढत आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबईत सम विषमचा प्रयोग करावा.नागरिकांनीही सार्वजनिक वाहनांचा वापर करावा. वाढते प्रदूषण ही खूप गंभीर समस्या आहे. ही समस्या केवळ मुंबई दिल्ली सारख्या मोठ्या शहरातच नाही आहे असे नाही तर संपूर्ण देशातच ही समस्या आहे. त्यामुळे देशातील सर्व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठी सरकारने कायम स्वरुपी ठोस उपाययोजना करावेत.

●●●●●

# हिवाळ्यात वजन कमी करायचे?

## स्वयंपाकघरातील हे पदार्थ ठरतील फायदेशीर



धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेकांना लठ्ठपणा, मधुमेह, रक्तदाब आणि मानसिक ताण यांच्यासारख्या समस्या उद्भवतात. लठ्ठपणामुळे तुम्हाला अनेक समस्या होऊ शकतात. दररोज सकाळी नियमित व्यायाम केल्यास आणि योग्य आहार खाल्यास लठ्ठपणा कमी होतो.

शरीरातील चरबी कमी करण्यासाठी तुमच्या तुमच्या आहारामध्ये काही विशेष गोष्टींचा समावेश करणे गरजेचे आहे. तुमच्या शरीरामध्ये लठ्ठपणा वाढल्यामुळे हार्मोनल बदल होतात. अशा स्थितीमध्ये वजन कमी करणे गरजेचे असते.

वजन कमी करण्यासाठी आहारामध्ये भरपूर प्रमाणात प्रोटिन फायबर आणि मिनरल्स सारख्या घटकांचा समावेश करावा लागणार. त्यासोबतच तेलकट आणि मसालेदार पदार्थांचे सेवन टाळावे लागेल.

तेलकट पदार्थांमध्ये भरपूर प्रमाणार फॅट्स आणि कॅलरिज असतात ज्यामुळे वजन वाढते. वजन कमी करण्यासठी तुमच्या आहारामध्ये काही विशेष गोष्टींचा समावेश करणे गरजेचे असते.

**हिरवी मिरची :** वजन कमी करण्यासाठी तुमच्या आहारामध्ये हिरव्या मिरचीचे सेवन फायदेशीर ठरते. हिरव्या मिरचीचे सेवन केल्यामुळे तुमचे आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते.

त्यासोबतच तुमचे चयापचय सुधारते. त्यामुळे तुम्हाला जर वजन कमी करायचे असेल तर दररोज २ ते ३ हिरव्या मिरच्या खाणे अत्यंतत फायदेशीर ठरेल.

**हिरवे मूग :** हिरव्या मुगाच्या डाळीमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन अ, ब, क आणि ई असते ज्यामुळे शरीर निरोगी राहाण्यास मदत होते. याशिवाय हिरव्या मुगाचे सेवन केल्यामुळे तुमच्या शरीराला योग्य प्रमाणात कॅल्शियम, लोह, फायबर आणि प्रोटीन मिळते. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारात हिरव्या मुगाच्या डाळीचे सेवन करा.

**वेलची :** दररोज तुमच्या आहारामध्ये वेलचीचे सेवन केल्यामुळे तुमच्या शरीरातील चयापचय सुधारते. तुमच्या दैनंदिन आहारामध्ये वेलचीचे सेवन केल्यामुळे तुमची पचनशक्ती वाढते, गॅस, ॲसिडिटी अशा समस्या होणार नाहीत. वजन कमी करायचे असेल तर दरोरज झोपण्यापूर्वी किंवा सकाळी लवकर उठल्यावर २ ते ३ वेलचीचे सेवन करावे.

**कढीपत्ता :** कढीपत्त्यात भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडेंट आणि लठ्ठपणाविरोधी गुणधर्म असतात. ज्यामुळे वजन कमी करण्यासाठी आणि शरीर डिटॉक्सिफाय करण्यासाठी आहारामध्ये कढीपत्त्याचे सेवन करणे गरजेचे असते.

**ग्रीन टी :** आजकाल अनेकांना ग्रीन टीचे सेवन करण्यास आवडते. ग्रीन टी प्यायल्यामुळे तुमच्या शरीरामध्ये चयापचय वाढते. त्यासोबतच तुमच्या शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती वाढण्यास मदत होते. दररोज सकाळी ग्रीन टीचे सेवन केल्यामुळे तुमच्या शरीरातील खराब चरबी वितळते आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते.

■ ■ ■

## अशोकायन

### आरोग्य हीच संपत्ती

आरोग्य हीच संपत्ती
मुद्दा ठेवा ध्यानी
आरोग्याची कराल हेळसांड
होईल अपरिमीत हानी ..

व्यायाम आहार निद्रा
यात असावे सामंज्यस्य
सुखी हसतमुख जीवनाचे
भाऊ ह्यात दडलय रहस्य..

संपत्ती असुनही करोडोची
जर शरीर देत नसेल साथ
उपभोग कसा घ्याल वस्तुंचा
आयी क्या समझमे बात?



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## महत्त्वाचे




### शेती मातीच्या संघर्षाचे प्रतिबिंब साहित्यातुन उमटायला हवे : मीठे

**इगतपुरी ।** साहित्य हे वास्तवाशी निगडीत असावे. सामान्य माणसाला केंद्रबिंदु ठेवुन त्याच्या जगण्याचा संघर्ष साहित्यात यायला हवा. सत्तेचे गुलाम नको, भांडवलदाराच्यां हातचे बाहुल नको, तर प्रस्थापितानां देशोधडीला लावणा-या व्यवस्थेविरुद्ध संघर्ष हवा, हे खरे साहित्य. शेती मातीचा लढा साहित्यातुन प्रतिबिंबित होऊन व्यवस्थेला हादरा देणारं साहित्य हवं असे आवाहन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे साहित्यिक विजयकुमार मिठे यांनी केले. व्यासपिठावर अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद राष्ट्रिय अध्यक्ष शरद गोरे, आमदार हिरामण खोसकर, स्वागताध्यक्ष गोरख बोडके, जेष्ठ साहित्यिक तथा परिषदेचे महाराष्ट्र उपाध्यक्ष देविदास खडताळे, परिषदेचे संघटक अमोल कुंभार, उद्योगपती तानाजी गायकवाड, अभिनेते तथा साहित्यिक अजय बिरारी आदिंसह मान्यवर उपस्थित होते. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे यांनी आपल्या भाषणात बहुजनांचा आवाज व साहित्य आणि संस्कृती दाबण्याचा प्रस्थापितांनी प्रयत्न केला. साहित्य संमेलने ही बहुजनांची वैचारिक व्यासपिठे आहेत आणि समाजानेच ती ताकदीने टिकवली पाहिजे असे प्रतिपादन केले. आमदार हिरामण खोसकर यांनी परिदेला भाषा, साहित्य व संस्कृती संशोधनासाठी एक कोटी रुपयाचा निधी देण्याची घोषणा यावेळी केली. तर कावनई गावचे सरपंच गोपाळ पाटिल, डॉ. महेंद्र शिरसाट आदिसह ग्रामस्थानीं संशोधन केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देण्याची घोषणा केली. प्रास्ताविक नवनाथ गायकर यांनी केले. सुत्रसंचालन बाळासाहेब गिरी यांनी केले.



### मनमाड शहर युनिटच्या वतीने संघटनेच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण

**नांदगाव |** नांदगाव तालुक्यातील मनमाडला बहुजन समाज पार्टी नांदगाव विधानसभा तथा मनमाड शहर युनिटच्या वतीने सिटु कामगार संघटनेच्या नेतृत्वाखाली पाच मागण्या घेऊन दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी सोमवार पासून आमरण उपोषणास बसलेले कामगार कुपोषणास बसले असून त्यांचा दुसरा दिवस आहे. उपोषण कर्त्यांच्या न्याय मागण्या त्यास समर्थ म्हणून बहुजन समाज पार्टी नांदगाव विधानसभा तथा मनमाड शहर युनिट च्या वतीने जाहीर पाठिंबा पत्र देण्यात आला. याप्रसंगी बहुजन समाज पार्टी नांदगाव विधानसभा अध्यक्ष प्रवीण डि पगारे, गौतम गायकवाड मनमाड शहर अध्यक्ष शालिग्राम निकम, विशाल पाटील, एजाज शेख, किशोर भाटे, ऋषभ अहिरे, सचिन अहिरे आदी उपस्थित होते.

### अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयांचे नवीन जागेत स्थलांतर

**देवळाली कॅम्प |** अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक व सहआयुक्त, अनुसूचित जमाती तपासणी समिती नाशिक-२ ही दोन्ही कार्यालये आदिवासी विकास भवन, दुसरा मजला, गडकरी चौक, नाशिक येथून डॉक्टर हाऊस, दुसरा मजला, ठक्कर बाजार समोर, त्र्यंबक नाका, नाशिक या नवीन इमारतीत स्थलांतरीत करण्यात आले आहे, अशी माहिती अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नाशिक २ चे सहआयुक्त तथा उपाध्यक्ष किरण माळी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. या दोन्ही कार्यालयांचे कामकाज नवीन इमारतीत ६ जानेवारी २०२५ पासून नियमित सुरू होणार असून अनुसूचित जमातीच्या नागरिकांनी आपल्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीच्या अनुषंगाने सर्व कामांसाठी नवीन स्थलांतरीत कार्यालयाच्या पत्यावर संपर्क साधावा तसेच पत्रव्यवहार करावा, असेही आवाहन माळी यांनी केले आहे




### रोहिले बुद्रुक येथील सभा मंडपाचे काम निकृष्ट; ठेकेदारावर कारवाईची मागणी

**नांदगाव |** नाशिक जिल्ह्याच्या नांदगाव तालुक्यातील घाट माथ्यावरील पुर्व भागात असलेल्या बोलठाण पासून पाच ते सहा किलोमीटर अंतरावर रोहिले बुद्रुक येथे सभा मंडपाचे काम झाले असून सदर निकृष्ट दर्जाचे झाले आहे. याची संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी चौकशी करून ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी मागणी रोहिले बुद्रुक नागरिकांकडुन होत आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, नांदगाव तालुक्यातील रोहिले बुद्रुक येथे सभा मंडपाचे बांधकाम मंजूर झाले होते. सदरचे काम सुरू असताना येथील नागरिकांनी व पदाधिकाऱ्यांनी चांगले काम करण्यासाठी ठेकेदारास सांगितले असता. न जुमानता नांदगाव तालुक्याचे नवनिर्वाचित आमदार सुहास अण्णा कांदे यांचे नाव दाखवून काम निकृष्ट दर्जाचे केले आहे. सध्या येथे केलेल्या सभा मंडपाचे बांधकामाला तडे गेले असून फडची खाली गेली आहे. तसेच या बांधकामासाठी निकृष्ट पद्धतीने वाळू वापरली आहे. व सभा मंडपाच्या ओट्यामध्ये पक्का मुरूम न टाकता माती टाकली आहे. त्यामुळे हे काम निकृष्ट झालेले आहे. तरी संबंधित विभागाने या कामाची प्रत्यक्षात पाहणी करून सदरचे काम सुस्थितीत चांगल्या प्रकारे करून घेऊन ठेकेदारावर कारवाई करावी व त्याचे लायसन रद्द करण्यात यावी अशी मागणी येथील पदाधिकारी व नागरिकांकडून होत आहे

## निधनवार्ता

### चंद्रभान महाले

**नाशिक ।** मखमलाबाद येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व बांधकाम



व्यावसायिक तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण संस्थेचे माजी सरचिटणीस चंद्रभान गंगाधर महाले उर्फ मामा (वय ७४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी मुक्ताबाई, मिलींद, राहूल, आशुतोष ही तीन मुले, नातवंडे असा परिवार आहे. मखमलाबाद येथील स्मशानभूमीत मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील नागरिक हजर होते. अनेकांनी यावेळी श्रद्धांजली वाहिली.

# पालिकेने लावलेल्या 70 हजार झाडांची पाहणी करावी

## हरित नाशिकसाठी पर्यावरण प्रेमींकडून नूतन आयुक्त मनिषा खत्री यांना साकडे

**देवळाली कॅम्प ।** पालिकेने लावलेल्या ७० हजार झाडांची नूतन आयुक्तांनी पर्यावरण प्रेमी संघटनांबरोबर पाहणी करावी, यासाठी आज शहरातील विविध पर्यावरण संघटनांच्या प्रतिनिधींनी नूतन पालिका आयुक्तांची भेट घेतली.

तब्बल १६ कोटी वार्षिक वृक्षबजेट असलेल्या उद्यान विभागाकडे सतत पाठपुरावा केल्यानंतरही शासकीय राजपत्रीत आदेशाप्रमाणे रस्त्याच्या कडेला विविध भारतीय प्रजातीच्या वृक्षलागवडीचा पालिकेकडून अजूनही मुहूर्त लागत नसतांना ब्लॉग प्लँटेशनने ७० हजार झाडे लावण्याचा दावा उद्यान अधीक्षकांनी केला आहे. प्रत्यक्ष भेटून व माहितीच्या अधिकारातही उद्यान विभागाकडून याबाबत खुलासा होत नसतांना खुद्द आयुक्तांनीच याबाबत माहिती द्यावी, अशी मागणी नूतन आयुक्तांना भेटून आज पर्यावरण प्रेमींकडून करण्यात आली.



शहरातील अवैध वृक्षतोडीस लगाम घालण्यासाठी वृक्षतोड नोटीस पालिकेच्या संकेत स्थळावर प्रसीद्ध करण्याचा पालिकेकडून लावण्यात आलेली विदेशी रोप काढून भारतीय प्रजातींच्या रोपांची लागवड करण्याचा व झाडांभोवतीचे कॉंक्रिटीकरण काढून न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्याचा गेल्या अनेक दिवसांपासून पर्यावरण प्रेमींकडून पालिकेकडे पाठपुरावा केला जात आहे. नवीन इमारत बांधकामाने शहराचा विकास होत असतांना पत्रे लावून अवैध वृक्षतोड न करता किमान मार्जीन स्पेस मधील पुरातन वृक्षसंपत्तीचे जतन करत बांधकाम व्यावसायिकांनी बांधकाम करावे व रहिवाशी इमारतीत कंपाउंडमध्ये नागरिकांनी बांधकाम व्यावसायिकांनी झाडे लावून त्यांचे संगोपन करणे पालिकेने बंधनकारक करण्याची मागणी पर्यावरण प्रेमी करत आहेत.

वृक्षवाढीस अडथळा ठरणाऱ्या व विद्युत विभागाकडून होणारी झाडांची असमतोल छाटणीने होणारे अपघात टाळण्यासाठी नाशिकसारख्या स्मार्ट शहरातील विद्युत तारा भूमिगत करण्याचीही मागणी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात पर्यावरण प्रेमींनी केलेली आहे. सिहंस्थ कुंभमेळ्याचे स्वागत हरित नाशिकच्या संकल्पनेने साजरे करण्यासाठी उद्यान विभाग अपयशी ठरत असेल तर शहरातील विविध सामाजिक संघटना हि जबाबदारी स्वीकारण्यास तयार असल्याबाबतचे पर्यावरण प्रेमींनी निवेदनात म्हटले आहे.

इंदोर पेक्षा स्वच्छ सुंदर शहर करण्याचा संकल्प घेतलेल्या आयुक्तांनीच हरित नाशिकसाठी जातीने लक्ष देण्याचे साकडेच आज पर्यावरण प्रेमींनी आयुक्तांना घातले. याबाबतची सर्व माहिती घेवून पुन्हा चर्चा करण्याचे आश्वासन नूतन आयुक्तांनी पर्यावरण प्रेमींना दिलेले आहे. नवीन वर्ष व नवीन आयुक्त नाशिकची थंड हवेची ओळख पुनः मिळवून देण्यात यशस्वी ठरो अशी अपेक्षा सामान्य नागरिकांकडून नवीन वर्षाचे व नूतन आयुक्तांचे स्वागत करतांना व्यक्त केली जात आहे.



## वॉर्ड ६ मधील सार्वजनिक शौचालयांची दुरावस्था

**देवळाली कॅम्प |** वॉर्ड क्र ६ येथील दगड चाळ ही मोल मजूर गरीबाची वस्ती असून देवळाली छावणी परिषद येथे दुर्लक्ष करीत असून गेल्या अनेक महिन्या पासून वारंवार निवेदन देऊनही प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

सार्वजनिक शौचालय महिला व पुरुष दोन्हीही नादुरुस्त झाले असून सेफ्टी टँक संपूर्ण खराब व चेंबर तुटल्याने मैला संपूर्ण बाहेर परसरला आहे. मागील काही दिवसात शौष खड्यात मधे गाय पडल्याने अथक प्रयत्ना नंतर स्थानिक नागरिक व कॅन्टोन्मेंट कर्मचाऱ्या कडून गाईला जीवनदान मिळाले होते. अशा घटना भविष्यात घडू नाही याकरिता उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे. शौचालयाची संपूर्ण दुरावस्था झाली असून वरील छताचे कडापे ढासाळण्याची शक्यता असून मानवी जीवितास संभाव्य धोका आहे. यामुळे शौचल्यास जाणे कठीण झाले आहे. यामुळे नागरिक वस्तीमधे डास, जंतू, हानिकारक कीटक यांचे मोठया प्रमाणात वाढ झाली रहिवास करणे ही कठीण झाले आहे. नागरिकांचे जीवनमान उंचावने तसेच स्वच्छ व निरोगी वातावरण मिळणे हे नागरिकांचे मूलभूत अधिकार आहेत.

सदर सार्वजनिक शौचालयाची तात्पुरती दुरुस्ती करून महिला व पुरुष दोन्ही शौचालये नवीन बांधून मिळावेत, येत्या आठ दिवसात कॅन्टोन्मेंट प्रशासनाने या वर काही तोडगा काढला नाही तर नागरिका कडून तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा येथील सामाजिक कार्यकर्ते शाम पवार यांनी दिला आहे.

निवेदन कॅन्टोन्मेंट बोर्डचे कार्यालयीन अधीक्षक विवेक बंड यांच्याकडे दगड चाळीतिल महिला मंडळाने दिले आहे, त्यावर उषा गांगुर्डे, मंजू महेश, लत्ता पवार, जयश्री पवार, संगीता बर्वे, शेख दिलषाद, मंगल पवार, प्रीती अहिरे आदी महिलांच्या स्वाक्षरी आहे.

## बदलत्या जीवनशैलीमुळे हृदय रोग्यांच्या संख्येत वाढ : डॉ. पवार

**नाशिक ।** योग्य आहार, नियमित व्यायाम आणि वेळच्यावेळी घेतलेली औषधे यामुळे हृदयाच्या विविध आजारांना रोखता येते असे प्रतिपादन हृदयाक्ष हॉस्पिटलचे डॉ. हिरालाल पवार यांनी केले. केटीएचएम महाविद्यालयातील व्याख्यानमालेचे पुष्प गुंफतांना डॉ. पवार म्हणाले की, तरुण व्यक्तीला येणारे हार्ट अटॅक खूप तीव्र स्वरूपाचे असतात. त्यामुळे वेळीच तपासणी करणे खूप गरजेचे आहे व हृदय रोगाची लक्षणे ओळखून लगेचच उपचार (ट्रीटमेंट) घेणे आवश्यक आहे. अचानक हार्ट अटॅक येत असेल, तर आजूबाजूच्या व्यक्तींना कोणती कशी मदत करावी याबाबतीत माहिती सांगितली.

पेशंटला हॉस्पिटल मध्ये नेण्याआधी सीपीआर करणे गरजेचे आहेत. तसेच सर्वांनीच सीपीआर कसा करावा, याचे प्रशिक्षण घेणे खूप गरजेचे आहे. त्यामुळे हृदय पंपिंग चालू राहते व मेंदूला रक्तपुरवठा होतो व पेशंटला वैद्यकीय मदत मिळेपर्यंत मदत मिळते. विमानतळावर ज्याप्रमाणे इनक्युबलेकराची सोय असते,



त्याप्रमाणे मॉल, थिएटर्स, कॉलेज व विविध ठिकाणी इनक्युब लेटरची उपलब्धता असणे व जनजागृतीची गरज आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे कमी झोप, अयोग्य आहार, तसेच सदैव स्टेसमध्ये जगणे यामुळे तरुणांमध्ये हृदयरोगाचे प्रमाण वाढले असून हृदयरोग झाल्यावर नियमित तपासणी द्वारे हार्ट अटॅकचा धोका टाळता येतो. नियमित व्यायाम करणाऱ्यांना हृदय रोगाची लक्षणे लवकर जाणवतात. वेळेतच अँजिओग्राफी, सिटी एनजीओ वगैरे उपचार वेळीच केले तर पेशंट वाचतात. वेळ निघून गेल्यावर पैशानेही उपचार होत नाही. उच्च बीपी, उच्च कोलेस्ट्रॉल,स्थुलपणा (ओव्हर वेट) डायबिटीज, चुकीचे डाएट वगैरे समस्या असतील, तर हार्ट अटॅकची शक्यता जास्त असते. त्यामुळे वेळीच काळजी घ्यावी असेही डॉ. पवार यांनी सांगितले.

आरोग्याच्या बाबतीत अति विश्वास बाळगू नये डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधे सुरू करावीत. समाजामध्ये हृदयरोगाविषयी जनजागृती झाली तर हजर पेशंट ऍडमिट करण्यापेक्षा आधीच तपासण्या केल्यास फक्त औषधोपचारानेच आपण हृदय रोगाचे धोके टाळू शकतो. यावेळी सर्व प्राध्यापकांच्या शंकांचे निरसन डॉ. पवार यांनी केले. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. एस. काळे, उपप्राचार्य डॉ.एस. के. शिंदे, विज्ञान विभाग प्रमुख के. आर. रेडगांवकर, कला विभाग प्रमुख आर. एस. पवार, वाणिज्य विभाग प्रमुख डी. बी. गावले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. के. शिंदे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय एस. बी. पाटील यांनी केला. किरण रेडगांवकर यांनी आभार मानले.

## सिनेमाला लाजवेल अशी नाशिकमध्ये निर्घृण हत्या

### कुऱ्हाडीने मुंडक तोडून दोघे भाऊ पोलीस स्टेशनला पोहोचले!

**नाशिक ।** दिंडोरीतील ननाशी गावात ही घटना घडली आहे. गुलाब वाघमारे असं हत्या करण्यात आलेल्या इसमाचं नाव आहे. तर सुरेश बोके आणि विशाल बोके अशी आरोपींची नाव आहे. नाशिक पेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली. आरोपी सुरेश बोके आणि विशाल बोके या दोघांचा मयत गुलाब वाघमारे याच्यासोबत जुना वाद होता. दोन वर्षांपूर्वी वाघमारे आणि बोके बंधूंमध्ये मारामारी झाली होती.

आज बुधवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास वाघमारे आणि बोके बंधू समोरासमोर आले. यावेळी तिघांमध्ये जुन्या भांडणाच्या वादातून बाचाबाची झाली. बाचाबाचीचं रुपांतर हाणामारीमध्ये झालं. दोन्ही बोके भावांनी गुलाब वाघमारे यांना बेदम मारहाण केली. हा प्रकार एवढ्यावरच थांबला नाही. रागाच्या भरात बोके बंधूंनी कुऱ्हाडीने वाघमारे यांचं शीर धडावेगळं केलं.

हत्या केल्यानंतर आरोपी सुरेश बोके आणि विशाल बोके हे वाघमारेंचं शीर हातात घेऊन पोलीस स्टेशनला पोहोचले. त्यानंतर पोलिसांना आपल्या कृत्याची कबुली दिली. पेठे पोलिसांनी दोन्ही आरोपीना तातडीने अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील दोन वर्षांपासून आरोपी बोके आणि गुलाब वाघमारेशी वाद सुरू होता.

या प्रकरणी दोन्ही गटाने एकमेकांविरोधात गुन्हे दाखल केले होते. पण आज बुधवारी बोके बंधूंनी जुन्या वादातून वाघमारेंची निर्घृणपणे हत्या केली. या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून आरोपी अटकेत आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहे.

## जि. प. अध्यक्ष चषक स्पर्धेत निगडोळ शाळेची यशस्वी घोडदौड

**नाशिक/दिंडोरी |** जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासह भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी दरवर्षी जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धेत मागील वर्षांपासून स्पेलिंग बी आणि यावर्षी नव्याने मॅथ बी स्पर्धेचाही समावेश करण्यात आला आहे. शाळा स्तर, केंद्र स्तर, बीट स्तर, तालुका स्तर आणि नंतर जिल्हा स्तर अशी ही स्पर्धा होत असून दिवसेंदिवस यात चुरस वाढतच चालली आहे.

यावर्षी निगडोळ केंद्रस्तरीय व बीट स्तरीय स्पर्धेत जिल्हापरिषद आदर्श शाळा निगडोळ येथील विद्यार्थ्यांनी दोन्ही स्तरावरील स्पर्धेत भरीव कामगिरी करताना बक्षिसांची लयलूट केली आहे. केंद्रस्तरावर झालेल्या स्पर्धेत रिया केतन गोडसे (१०० मीटर



**बीटस्तरीय स्पर्धेत चित्रकला स्पर्धेचे प्रथम पारितोषिक स्वीकारताना सृष्टी जनार्दन गटकळ. समवेत विस्तार अधिकारी कैलास पगार, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार बापूतात्या चव्हाण, मुख्याध्यापक राजेंद्र उगले, पंचायत समिती माजी सदस्या श्रीम. बेबीताई सोळसे, पालखेड सरपंच श्रीम. रेखाताई गांगोडे , शिक्षक नितीन पवार, विश्वास आहेर, निलेश भारती आदी.**

धावणे-द्वितीय), पूजा कैलास कड (२०० मीटर धावणे-तृतीय), मोहित संदीप चारोस्कर (बुद्धिबळ प्रथम), साहिल केशव गायकवाड( बुद्धिबळ द्वितीय), सिद्धी योगेश मालसाने (मॅथ बी प्रथम), सृष्टी जनार्दन गटकळ (चित्रकला प्रथम), तेजल अनिल मालसाने (वैयक्तिक गायन-द्वितीय), अनुष्का दुशिंग (मॅथ बी द्वितीय) रुद्र योगेश मालसाने (स्पेलिंग बी-तृतीय), रुपाली बाळू दुशिंग (मॅथ बी तृतीय), वैष्णवी अशोक बोरस्ते (स्पेलिंग बी तृतीय), आयुष्य सुरेश घिवंदे (मॅथ बी द्वितीय), समूह गीतगायन (द्वितीय) याप्रमाणे कामगिरी बजावून बीट स्तरावर धडक दिली. यातील रिया केतन गोडसे, तेजल अनिल मालसाने, मोहित संदीप चारोस्कर, सिद्धी योगेश मालसाने, सृष्टी जनार्दन गटाकळ, साहिल केशव गायकवाड, अनुष्का दुशिंग या विद्यार्थ्यांनी उत्तम खेळ करून प्रथम आणि द्वितीय क्रमांकाची बक्षिसे प्राप्त केली.

पैकी सृष्टी जनार्दन गटकळ, मोहित संदीप चारोस्कर, आणि सिद्धी योगेश मालसाने या विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंना मुख्याध्यापक राजेंद्र उगले, शिक्षक हेमंत खैरनार, नितीन पवार, विश्वास आहेर, संजय पाटील, निलेश भारती, बळीराम भोये, योगिता गावित, विमल गावित, पूनम पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जि प आदर्श शाळा वाघाडचे मुख्याध्यापक अशोक बोरसे, पालखेडचे मुख्याध्यापक प्रवीण खैरनार यांनी मेहनत घेतली. यशस्वी विद्यार्थ्यांचे विस्तार अधिकारी (शिक्षण) कैलास पगार, केंद्रप्रमुख देविदास गांगुर्डे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बापू रहेरे, सरपंच कृष्णा रहेरे यांनी व पालकांनी अभिनंदन केले आहे.

# खुसखुशीत मशरूम पोहा कटलेट

आपल्यापुढे संध्याकाळच्या स्नॅक्सचा प्रश्न आ वासून उभा असतो. चहाला आलेल्या पाहुण्यांना छानसा पदार्थ खिलवण्यासाठी मग यू ट्यूबवरचे रेसिपी व्हिडिओ धुंडाळले जातात. पाककलेची पुस्तकं चाळली जातात. पाहुण्यांसाठी काहीतरी हटके बनवण्याच्या विचारात असाल तर ही मशरूम पोहा कटलेट रेसिपी नक्की ट्राय करा.

**साहित्य:** दोन कप मशरूम, दीड कप पोहे, एक बारीक चिरलेला कांदा, अर्धा कप बारीक चिरलेली फरसबी, अर्धा कप किसलेलं गाजर, चमचाभर आल्याची पेस्ट, एक मिरची, अर्धा टी स्पून लाल तिखट, प्रत्येकी पाव चमचा गरम मसाला, चाट मसाला, आमचूर, चिरलेली कोथिंबिर, ब्रेड क्रम्स, तेल आणि चवीनुसार मीठ

**कृती:** पोहे पंधरा मिनिटं भिजवून ठेवा. चाळणीत ठेऊन पाणी काढून टाका. आता कढईत थोडं तेल गरम करा. कांदा सोनेरी रंगावर परतून घ्या. यात हिरव्या मिरचीचे तुकडे, गाजर, फरसबी आणि आल्याची पेस्ट घालून दोन ते तीन मिनिटं शिजवून घ्या. भाज्या शिजल्यावर गॅस बंद करा. हे मिश्रण थंड झाल्यावर त्यात मशरूमचे काप, लाल तिखट, गरम मसाला, चाट मसाला, आमचूर,



पोहे,कोथिंबिर आणि मीठ घालून नीट मॅश करून घ्या. या मिश्रणाचे छोटे किंवा मध्यम आकाराचे चपटे गोळे करा. ब्रेड क्रम्सने कोटिंग करा. कढईत तेल गरम करा. त्यात हे गोळे तळून घ्या. हे कटलेट तुम्ही शॅलो फ्रायही करू शकता. सॉस किंवा चटणीसोबत खायला द्या.

रसगंधा

# अस्मिता

# लढा तंबाखू विरोधात

**भारतात तोंडाच्या कॅन्सरचं प्रमाण बरंच जास्त आहे. गरीब घटकातली लहान मुलंही या कॅन्सरला बळी पडत आहेत. तंबाखूचं सेवन हे यामागचं महत्त्वाचं कारण. तंबाखूच्या दुष्परिणामांची या मुलांना अजिबात कल्पना नसते. तंबाखूमुळे नवी पिढी उध्वस्त होत असल्याचं पाहून डॉ. सुमेधा कुशवाह खूप अस्वस्थ झाल्या. तोंडाच्या कॅन्सरबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी कंबर कसली. याची चांगली फळं त्यांना मिळत आहेत.**

व्यवसायाने डेंटिस्ट असणाऱ्या डॉ. सुमेधा कुशवाह तंबाखूचं व्यसन कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. समाजातल्या विविध घटकांना तंबाखूमुक्त आयुष्य जगण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करत आहेत. त्यांनी अनेकांना तंबाखूचं व्यसन सोडवायला मदत केली आहे. सुमेधा यांनी बीडीएस आणि एमडीएसची पदवी घेतली आहे. दिल्लीतल्या महाविद्यालयातून दंतवैद्यकशास्त्राची पदवी घेणाऱ्या सुमेधा यांना ओपीडीतल्या तपासणीदरम्यान तोंडाचा कॅन्सर झालेले किंवा कॅन्सर होण्याच्या टप्प्यापर्यंत पोहोचलेले बरेच रुग्ण भेटले. तंबाखूचं सेवन हे त्यांच्या कॅन्सरचं महत्त्वाचं कारण होतं. तोंडाच्या कॅन्सरच्या रुग्णांची ही वाढती संख्या सुमेधा यांना अस्वस्थ करून गेली. तंबाखूचा प्रभाव कमी करण्यासाठी काहीतरी करायला हवं हे तेव्हाच त्यांच्या मनात आलं.

मानिनी

तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करण्याचे बरेच प्रयत्न होत असले तरी समाजातला एक मोठा घटक या व्यसनापासून मुक्त झालेला नाही. तंबाखू सोडण्याच्या दृष्टीने त्यांना कोणतंही मार्गदर्शन मिळत नाही. अशा वर्गासाठी काम करण्याचा निश्चय सुमेधा यांनी केला. एका आरोग्य शिबिरात त्यांना तोंडाच्या कॅन्सरने ग्रस्त असणारा १३ वर्षांचा मुलगा भेटला. त्याला तोंडही उघडता येत नव्हतं. वेदनेने विव्हळणाऱ्या त्या मुलाला बघून सुमेधा अक्षरश: हादरून गेल्या. तोंडाच्या कॅन्सरचं भयावह रूप त्यांच्या समोर होतं. गुटखा खाण्याचे परिणाम या मुलापर्यंत पोहोचलेच नव्हते. याच निष्काळजीपणाविरोधात सुमेधा यांना लढा उभा करायचा होता. तरुण मुलं आपलं आयुष्य अशाप्रकारे उध्वस्त करत असल्याचं त्यांना बघवलं नाही. म्हणूनच त्यांनी प्रशिक्षित समुपदेशक होण्याचा निर्णय घेतला.



या प्रशिक्षणासाठी त्या नावाजलेल्या रुग्णालयात रूजू झाल्या. या रुग्णालयात समुपदेशनासाठी येणाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारलं जायचं. गरीब घटकातल्या रुग्णांना एवढे पैसे परवडू शकत नव्हते. मधल्या काळात सुमेधाने तोंडाचा कॅन्सर आणि तंबाखू नियंत्रणाच्या क्षेत्रातल्या विविध एनजीओंसोबत काम केलं. मात्र त्यांना स्वत:च्या पद्धतीने बदल घडवायचा होता. यासाठी त्यांनी 'एम टू टर्मिनेट टोबॅको अँड कॅन्सर'(एटीटीएसी) या संस्थेची स्थापना केली. यात त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांचीही साथ लाभली. त्यांच्या संस्थेला 'युवराज सिंह फाउंडेशन'कडून निधी मिळतो. विविध कॉर्पोरेट ऑफिसेसमध्येही त्यांची संस्था कार्यशाळेचं आयोजन करते. २०१४ मध्ये त्यांनी ही संस्था सुरू केली होती. आजवर त्यांनी ३० हजार लोकांना तंबाखू मुक्तीचा मार्ग दाखवला आहे. छोटी शहरं आणि गावांमध्ये त्यांना पोहोचायचं आहे. सुमेधा कुशवाह यांना आपला समाज तंबाखूमुक्त झालेला पहायचा आहे.

हेअर केअर

## होममेड मिस्ट



केसांची चमक वाढवणारी बरीच उत्पादनं बाजारात मिळतात. पण त्यातली रसायनं घातक ठरू शकतात. म्हणूनच घरीच तयार केलेलं मिस्ट तुम्ही वापरू शकता. यासाठी तीन चमचे खोबरेल तेल आणि वाटीभर गुलाब पाणी घ्या. गुलाब पाण्यात खोबरेल तेल मिसळा. हे मिश्रण स्प्रे बॉटलमध्ये भरा. केस धुण्याच्या अर्धा तास आधी हा स्प्रे केसांवर फवारा. मग हलक्या हाताने मसाज करा. केस खूप कोरडे झाले असतील तर रोज रात्री केसांवर स्प्रे करून मसाज करा. केस शँपूने धुतल्यानंतरही स्प्रे करा. यामुळे केस मुलायम होतील.

स्मार्ट टिप्स

## बॅकलेस घालण्याआधी...

बॅकलेस ब्लाउज किंवा ड्रेस घालण्याआधी पाठीचं सौंदर्य खुलवायला हवं. पाठीवर पुरळ किंवा ब्लॅकहेड्स असतील तर दिवसातून दोन वेळा आंघोळ करा. नियमितपणे बॅक स्क्रबिंग करून घ्या. यासाठी संत्र्याची सालं वाळवून पूड करून घ्या. त्यात दूध मिसळून पेस्ट तयार करा. आठवड्यातून दोन वेळा पाठीला लावा. स्क्रब केल्यामुळे पाठीचा रक्तप्रवाह सुरळीत सुरू राहील. पाठीला ॲलोव्हेरा जेलने मसाज करता येईल किंवा एखादा पॅकही लावता येईल. तुम्ही पील ऑफचा वापरही करू शकता. बॅकलेस घालण्याआधी पाठीला चेहऱ्याप्रमाणे मेक अप करा. फाउंडेशन, कॉम्पॅक्ट लावा. पाठ चमकदार दिसण्यासाठी शिमर लूक देणारं लोशनही लावता येईल. पाठीचं ब्लीचही करून घ्या.



# आयडियाज फॉर रिनोव्हेशन

घरातला तोचतोपणा कंटाळवाणा वाटू लागतो तेव्हा रिनोव्हेशन करावंसं वाटू लागतं. कल्पनेत हे जितकं रम्य असतं त्यापेक्षा वास्तव भयानक असतं कारण एकदा रिनोव्हेशन सुरू झालं की ॲडव्हान्सच्या नोटा मोजताना मिळालेलं 'मॅडमजी दस दिन में काम निपटेगा, फिकर मत किजिए' हे वचन चक्रवाढव्याज साचल्यासारखं वाढत जातं आणि त्यावर दिवसांचंच काय पण आठवड्यांचं व्याज चढायला लागतं! दहा दिवसांचा वायदा असतो. त्यामुळे सातव्या दिवसापासून आपला काउंटडाऊन सुरू होतो आणि बाराव्या-तेराव्या दिवशीही काम निपटलेलं नसतं तेव्हा तर आपला मिस्त्रीसोबत रितसर पंगाच होतो. घरात जिकडे तिकडे सांडलेलं सिमेंट, भिंतीवरचे थर, पाणी आणि हत्यारांची कचकच हे सगळं असह्य होऊन 'उचल तुझं सामान आणि चालू लाग' असं सांगण्याचा मोह आवरत नाही; पण करता काय? हे सगळं आपल्याला करता येण्यासारखं नसतं. घराचं रिनोव्हेशन करणाऱ्या सर्वांचंच हे असं होतं. या सगळ्यात कमीत कमी त्रास व्हावा असं वाटत असेल तर योग्य 'प्लॅनिंग' सर्वात महत्वाचं. पहिला नियम म्हणजे सगळं काम एकदम काढू नका. एकाच फटक्यात सगळं होऊन जाईल हे ऐकायला बरं वाटत असलं तरी हा फटका किती दिवसांचा असू शकतो याला काही मर्यादा असत नाही. म्हणून प्लॅनिंग करताना नेमकी काय काय कामं करायची आहेत याची यादी बनवा आणि ती बनवताना मोठी कामं वेगळी आणि लहान कामं वेगळी काढा. लहान सहान कामं आधी करून घ्या. स्वीच बोर्ड बदलणं, प्लंबिंग किंवा तत्सम कामं आधी करवून घ्या. भिंतीच्या फोडाफोडीची आणि बांधण्याची कामं आणि रंगकाम एका फटक्यात करा. ही कामं शक्यतो प्रोफेशनल सर्व्हिसकडून करवून घ्या कारण सामान हलवण्याचं मोठं काम परस्पर होणार असतं. शिवाय दिलेल्या मुदतीच्या फार फार तर एक-दोन दिवस इकडे तिकडे होऊन ते पूर्ण होतं. सर्वात महत्वाचं म्हणजे ज्याप्रमाणे खर्च थोडा फार कमी जास्त होतो तसंच हे दिवसांचं गणितही गडबडणार असतं हे गृहीत धरा. म्हणून समोरचा दहा दिवस सांगत असेल तर तुमची तयारी पंधरा दिवसांची ठेवा.

लक्षात घ्या



# सुरू करा मेहंदीचा व्यवसाय

नोकरीसोबत एखादा जोड व्यवसाय करण्याचा विचार असेल किंवा नव्याने व्यवसाय सुरू करण्याच्या प्रयत्नात असाल तर मेहंदी विक्रीचा चांगला पर्याय तुमच्याकडे आहे. आपल्या संपर्काच्या बळावर हा व्यवसाय पुढे नेता येईल. मेहंदी विक्रीच्या व्यवसायाबाबतचं हे मार्गदर्शन...

✻ मेहंदीच्या बाजारपेठेत अजून विशिष्ट ब्रँडने स्वत:ची मक्तेदारी प्रस्थापित केलेली नाही. त्यामुळे साध्या मेहंदीचीही मोठ्या प्रमाणावर विक्री होते. म्हणूनच या क्षेत्रात स्वत:चं स्थान निर्माण करताना फारशा अडचणी येणार नाहीत. वितरणाच्या कक्षा विस्तारून तुम्ही तुमचे मेहंदी कोन विविध ठिकाणी विक्रीसाठी ठेऊ शकता.

✻ मेहंदीचा उद्योग सुरू करण्यासाठी फार भांडवल आणि उपकरणांची गरज नसते. यात सर्वात महत्त्वाचा असतो तो कच्चा माल म्हणजे मेहंदीची पानं. तसंच मेहंदीचा दर्जा वाढवण्यासाठी लागणाऱ्या काही वस्तू तसंच पॅकिंगसाठी प्लास्टिक आणि इतर साधनं घेतली की तुम्ही व्यवसाय सुरू करू शकता. यासोबतच पल्वरायझर मशीन, मेहंदीतला कचरा चाळण्यासाठी चाळणी, वजनकाटा आणि मेहंदीची पाकिटं सील करण्यासाठी पाऊच सीलिंग मशीन लागेल.



✻ मेहंदीच्या पानांपासून त्याची पूड तयार करण्यासाठी लागणारं युनिट बसवणं फार कठीण नाही. तसंच यासाठी फार जागाही लागत नाही. फक्त युनिट असणाऱ्या ठिकाणी भरपूर सूर्यप्रकाश यायला हवा.

✻ मेहंदीची पानं तुम्ही विक्रेत्यांकडून विकत घेऊ शकता. शक्य असेल तर मेहंदीची लागवडही करू शकता. मेहंदीच्या पानांचे तीन प्रकार असतात. काळे डाग पडलेली पानं हलक्या दर्जाची मानली जातात तर हलकी पिवळी झालेली पानं मध्यम दर्जाची असतात. मेहंदीच्या हिरव्यागार पानांचा दर्जा सर्वोत्तम असतो. मेहंदी तयार करण्यासाठी ही पानं वेगळी करून सुकवून घ्या. मशीनमध्ये टाकून मेहंदी पावडर तयार करा. ही पावडर चाळून घ्या. वजनाप्रमाणे पॅक करा. मेहंदीची ही पाकिटं दुकानांमध्ये विक्रीसाठी पाठवता येतील.

स्कील डेव्हलपमेंट

हेल्दी लाईफ

## पर्याय गव्हाच्या पोळीला...

वजन कमी करण्यासाठी आहारातलं कर्बोदकांचं प्रमाण कमी करावं लागतं. गव्हाच्या पोळीत कर्बोदकांचं प्रमाण जास्त असतं. त्यातच नेहमी गव्हाची पोळी खाऊन खूप कंटाळा येतो.



अशा वेळी तुम्ही लो कॅलरी आणि लो कार्ब धान्यांपासून पोळी किंवा भाकरी बनवू शकता. नाचणीची भाकरी हा पोळीला खूप चांगला पर्याय ठरेल. विविध जीवनसत्त्वं आणि खनिजांची युक्त नाचणी वजन कमी करणाऱ्यांसाठी वरदान आहे. सोयाबिनच्या पीठापासून पोळ्या करता येतील. ओट्सची बिस्किटं, कुकीज, एनर्जी बार लोकप्रिय आहेत. त्याचप्रमाणे याच्या पोळ्याची करता येतील. ओट्सची चव आवडत नसेल तर कणकेत थोडं ओट्सचं पीठ मिसळता येईल.

# बाळाच्या जन्माआधी...

गर्भारपण हा प्रत्येक आईसाठी आनंदाचा अनुभव असतो असं नाही. अनेकजणी या कालावधीत अनेक प्रकारच्या तणावातून जात असतात. काहीजणींना नोकरीच्या ठिकाणी तणावाला सामोरं जावं लागतं तर काहीजणींना कौटुंबिक कलहाच्या तणावाला. आपल्याकडे म्हणजे भारतीय समाजात असं मानण्यात येतं की भावी मातेनं नऊ महिन्यांच्या कालावधीत नेहमी हसतं खेळतं असलं पाहिजे. तज्ज्ञांच्याही मते भावी आईचे हे नऊ महिन्यातले मनाचे खेळ बाळाच्या आयुष्यावर कायमस्वरुपी परिणाम करत असतात. म्हणून या नऊ महिन्यात तिनं तणाव दूर ठेवत हर प्रकारे आनंदी रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आवडतं संगीत, आवडती पुस्तकं वाचून किंवा खावंसं वाटतं ते तब्येतीची काळजी घेत खाऊन, प्रिय व्यक्तींच्या सानिध्यात राहून आनंद मिळवला पहिजे. गर्भारपणात ज्या माता तणावातून जातात त्यांची मुलं कुरकुरी, छोट्या छोट्या प्रसंगातही भेदरणारी असण्याच्या शक्यता जास्त असतात. बाळाला काहीही लागलं, दुखलं-खुपलं किंवा भीती वाटली तर ते आईच्या कुशीत आल्यानंतर शांत होतं. ही सुरक्षिततेची भावना त्याला पोटात असल्यापासूनच होत असते असं तज्ज्ञांचं मत आहे. पोटात असताना आईचा हळूवार स्पर्श आणि त्याच्याशी संवाद साधणं त्याला थेटपणानं समजत नसलं तरी या भावनेचा आणि लहरींचा सकारात्मक परिणाम बाळावर होत असतो असं त्यांचं मत आहे. मुलांच्या भावनिक समस्यांचा अभ्यास करणाऱ्यांच्या मते बहुतेक वेळा अशा मुलांच्या समस्यांचं मूळ त्यांच्या गर्भातल्या असुरक्षिततेच्या भावनेशी जाऊन मिळतं. भावी आयुष्यात ही मुलं तणावाला कशी सामोरी जाणार हेदेखील याच कालावधीतल्या असुरक्षिततेशी जाऊन मिळतं असं त्यांचं मत आहे. मँचेस्टर येथील एका महाविद्यालयात पहिलटकरीण आणि तिचे भावनिक तणाव आणि मुलाची पहिल्या वर्षातली भावनिक वाढ याबाबत एक अभ्यास केला गेला. त्यावेळी असं दिसून आलं की, ज्या माता नऊ महिने तणावात होत्या त्यांची मुलं जास्त रागीट, आक्रमक आणि 'डिप्रेशन प्रोन' होती. याच अभ्यासादरम्यान असं निदर्शनास आलं की आई तणावात असली आणि तिनं बाळाला थोपटलं तर त्याचाही सकारात्मक परिणाम दिसून येतो. सात महिन्याची गर्भवती आपल्या पोटावर बाळाला थोपटल्याप्रमाणे अलगद थोपटते आणि लाड करते त्यावेळेस बळाच्या हार्टरेटमध्ये फरक दिसून आला.



काळजी घ्या

# एकटं वाटतंय!

मी २३ वर्षांची तरुणी असून फ्रान्समध्ये उच्च शिक्षण घेते आहे. इथे मला मित्रमैत्रिणी मिळाले आहेत. भारतातल्या एका मुलासोबत मी लाँग डिस्टंस रिलेशनशीपमध्ये आहे. त्याच्या आणि भारतातल्या इतर मित्रमैत्रिणींच्या मी सतत संपर्कात असते. हे सगळं करूनही मला इथे खूप एकटं वाटतं. इथलं सर्व काही सोडून भारतात निघून जावं असं सतत वाटत रहातं. व्यस्त रहाण्यासाठी मी छंदवर्गांना जाते. पार्ट टाईम जॉबही करते. पण एकटेपणा मला खात रहातो. ही स्थिती नॉर्मल आहे का? मी मानसोपचारतज्ज्ञाकडे जायला हवं का? मला मार्गदर्शन करा.



– परदेशात गेल्यानंतर एकटेपणा जाणवणं नैसर्गिक आहे. आपल्या माणसांपासून, संस्कृतीपासून लांब गेल्याने नैराश्य येणं अगदी स्वाभाविक आहे. मला वाटतं तू स्वत:ला वेळ द्यायला हवा. तुझ्या मनातल्या विचारांचा उहापोह करणंही गरजेचं आहे. सर्वात आधी तू तुझे प्राधान्यक्रम ठरव. फ्रान्समध्ये शिक्षण घेणं तुझी प्रायोरिटी असेल तर तिथल्या वातावरणाशी जुळवून घे. भारतात परतल्याने तुझं भलं होणार असेल तर तोही विचार कर. घरच्यांशी बोल. तू मानसोपचारतज्ज्ञांची मदत घेऊ शकतेस. भारताला, आपल्या संस्कृतीला मिस करत असशील तर फ्रान्समधल्या भारतीयांशी संपर्क साध. त्यांच्यात मिसळण्याचा प्रयत्न कर. भारतीय मुलंही तुझ्यासोबत असतील. त्यांच्याशी मैत्री कर. काही काळानंतर तुला तिथल्या परिस्थितीशी नक्कीच जुळवून घेता येईल.

समुपदेशन

# गेट रेडी फॉर वीकेंड

वीकेंडला एखादा प्लॅन ठरल्यावर ऑकेजनला साजेशा पेहरावाचा शोध सुरू होतो. अशावेळी नेहमीच्या फॉर्मल्सपेक्षा काहीतरी ट्रेंडी, हटके घालण्याची संधी असते. उन्हाळ्यात तर हमखास वीकेंड प्लॅन्स ठरतात. कुटुंबिय, मित्रमैत्रिणींसोबत पिकनिक, ब्रंच किंवा शॉपिंगला जायचं असेल तर पेहरावही मोकळाढाकळा हवा. वीकेंड फॅशनच्या या काही टिप्स...

✻ आरामदायी, स्टायलिश आणि ट्रेंडी अशा तिन्ही गोष्टींचा मेळ साधायचा असेल तर शर्ट ड्रेसला पर्याय नाही. शर्ट ड्रेसची सध्या प्रचंड क्रेझ आहे. तुम्हाला शर्ट आवडत असेल पण जीन्स किंवा ट्राउझर घालायचा कंटाळा आला असेल तर शर्ट ड्रेस ट्राय करा. हा पेहराव तुम्हाला सॉफिस्टिकेट लूक देईल. फिटिंगवाला किंवा थोडा ढगळ शर्ट ड्रेस घ्या. त्यावर बेल्ट बांधा. मोजक्या ॲक्सेसरीज घाला. तुमची फॅशन नक्कीच लक्षवेधी ठरेल.



✻ यंदा डंगरीची फॅशनही इन आहे. डंगरी हा प्रकार बऱ्याच वर्षांपासून चलनात असला तरी यंदा त्याचे अनेकविध पर्याय पहायला मिळत आहेत.

✻ फ्लोरलला प्रचंड डिमांड असते. एखाद्या संध्याकाळी मस्त हवेत उडणारा, झुळझुळता फ्लोरल ड्रेस घाला. मुलायम अशा शीर फॅब्रिकचे फ्लोरल ड्रेस खूप छान दिसतील. कंफर्टसाठी कॉटन ड्रेस ट्राय करा.

स्टाईल स्टेटमेंट

✻ चारचौघींमध्ये उठून दिसायचं असेल तर जंपसूट घाला. फॉर्मल आणि कॅज्युअल अशा दोन्ही ऑकेजन्सना जंपसूट चालून जातो. हा पेहराव दिवसभर कॅरी करता येईल. दिवसभर शॉपिंग केल्यानंतर रात्री डिनरचा कार्यक्रम असेल तरी तुम्ही जंपसूट घालू शकता.

✻ तुम्ही क्रॉप टॉपही वेगवेगळ्या पद्धतीने ट्राय करू शकता. या टॉपवर डेनिम जॅकेट किंवा श्रग घालता येईल. क्रॉप टॉपमध्ये तुम्ही ट्रेंडी दिसाल.

# चेहरा निस्तेज दिसतोय?

जुने फोटो बघताना आपण किती बारीक होतो, आपली त्वचा कशी नितळ आणि तजेलदार दिसायची असे विचार मनात रूंजी घालत रहातात. काळाच्या ओघात त्वचा निस्तेज दिसू लागते. तरुण वयातलं चेहऱ्यावरचं तेज कुठेतरी गायब होतं. यामागे बरीच कारणं असतात. अर्थात त्वचेच्या समस्यांवर उपायही आहेतच. त्वचा निस्तेज होण्यामागची कारणं आणि त्यावरचे उपाय जाणून घेऊ या.

✻ मृत पेशी हे त्वचा निस्तेज दिसण्याचं महत्त्वाचं कारण आहे. त्वचेतल्या या मृतपेशी साठून राहिल्याने चेहऱ्याचा तजेला हरपतो. चेहरा काळपट दिसू लागतो. मृतपेशी काढून टाकण्यासाठी आठवड्यातून एक किंवा दोनवेळा चेहरा एक्सफोलाइट करायला हवा. संवेदनशील त्वचा असेल तर होममेड स्क्रब्ज वापरा. नियमित स्क्रबिंगमुळे मृत त्वचेचा प्रभाव कमी होईल. उन्हाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी स्क्रबिंग शक्यतो रात्री करा.

✻ ओलावा कमी झाल्यामुळेही त्वचा निस्तेज आणि कोरडी दिसू लागते. हे टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या. दररोज सकाळी आणि रात्री चेहऱ्याला मॉईश्चरायझर लावा. यानंतरही कोरडेपणा दूर होत नसेल तर मॉईश्चरायझर लावण्याआधी फेस ऑईल्स आणि सिरम्सचा वापर करा.

ब्युटी टॉक

✻ उन्हामुळे त्वचेचं सर्वात जास्त नुकसान होतं. पुरेशा काळजीअभावी चेहऱ्यावर काळे डाग पडणं, हायपरपिंग्मेंटेशनसारख्या समस्या डोकं वर काढतात. सातत्याने उन्हात फिरल्याने चेहरा पार काळवंडून जातो. उन्हात जाणं टाळता येत नाही. पण सन्सक्रीनचा पर्याय तुमच्याकडे आहे. उन्हामुळे स्कीन कॉलाजेनचं संतुलन बिघडतं. कॉलाजेनचं नुकसान टाळण्यासाठी त्वचातज्ज्ञाच्या सल्ल्याने रेटिनॉलयुक्त उत्पादनांचा वापर करता येईल.

✻ वाढतं प्रदूषण हे सुद्धा त्वचेच्या समस्यांचं महत्त्वाचं कारण आहे. प्रदूषित घटकांमुळे त्वचेवर फ्री रॅडिकल्सची निर्मिती होते. यामुळे कॉलाजेनचं नुकसान होतं. परिणामी स्कीनटोनचं संतुलन बिघडतं. प्रदूषणाचा परिणाम कमी करण्यासाठी घरी आल्यावर चेहरा धुवून घ्या. यामुळे त्वचेवरची धूळ आणि प्रदूषित घटक स्वच्छ होतील. क जीवनसत्त्वयुक्त सिरम्स आणि लोशन्सचा वापर प्रभावी ठरू शकेल.



✻ ताणामुळेही त्वचा निस्तेज होते. शरीरात स्ट्रेस हार्मोन्सचं प्रमाण वाढलं की चेहऱ्याला होणाऱ्या रक्तप्रवाहाचं प्रमाण कमी होतं आणि त्वचा काळपट दिसू लागते. ताण कमी करण्यासोबतच रक्तपुरवठा सुधारण्यासाठी चेहरा धुताना तसंच मॉईश्चरायझर लावताना हलक्या हातांनी मसाज करा. यामुळे चेहऱ्याची चमक परत येईल.

# बँक, फार्मा आणि आयटी शेअर्स घसरले



## शेअर बाजारात मोठी घसरण

**मुंबई, दि. ३ प्रतिनिधी**

व्यवहाराच्या शेवटच्या दिवशी म्हणजे शुक्रवारी शेअर बाजारात मोठी घसरण नोंदवली गेली, तर आदल्या गुरुवारी मोठी वाढ दिसून आली. आजच्या ट्रेडिंग सत्रात सेन्सेक्स आणि निफ्टी जवळपास 1 टक्क्यांच्या घसरणीसह बंद होत आहेत. आयटी, फार्मा आणि बँकिंग समभागांनी बाजार खाली आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शुक्रवारी, निफ्टी 184 अंकांनी किंवा 0.76% ने घसरला आणि 24,004.75 च्या पातळीवर बंद झाला, तर सेन्सेक्स 720.60 अंकांनी किंवा 0.90% ने घसरला आणि 79,223.11 च्या पातळीवर बंद झाला.

आजच्या ट्रेडिंग सत्रात, सरकारी मालकीची तेल कंपनी ONGC चे समभाग सर्वाधिक 5.21 टक्क्यांच्या वाढीसह 258.89 रुपयांच्या पातळीवर बंद झाले, तर टाटा मोटर्स

**सेन्सेक्स 79,223**

**निफ्टी 24,004**



3.32% वाढून 790.40 रुपयांच्या पातळीवर बंद झाले. यानंतर टायटन कंपनीचे शेअर्स 1.86% च्या वाढीसह 3,452 च्या पातळीवर बंद झाले, तर SBI Life ने 1.79% ने उसळी मारली आणि 1,448 च्या पातळीवर बंद झाला. याशिवाय एचयूएलचे शेअर्स 1.53 टक्क्यांनी मजबूत झाले आणि 2,406 रुपयांच्या पातळीवर बंद झाले.

त्याच वेळी, विप्रोचे शेअर्स सर्वाधिक 3.08% घसरले आणि 294.45 च्या पातळीवर बंद झाले, तर HDFC बँकेचे शेअर्स 2.49% नी घसरले आणि 1,749 च्या पातळीवर बंद झाले. याशिवाय, टेक महिंद्राचे शेअर्स 2.18% घसरून रु. 1,689 वर बंद झाले, तर अदानी पोर्ट्स SEZ चे शेअर्स 2.16% घसरून रु. 1,200 वर बंद झाले. त्याच वेळी, आयसीआयसीआय बँकेचे समभाग 1.98% ने कमकुवत झाले आणि 1,265 च्या पातळीवर बंद झाले.

आजच्या व्यवहारात निफ्टी एफएमसीजी निर्देशांक 0.25% च्या वाढीसह 57,817 स्तरावर बंद झाला. निफ्टी मेटल इंडेक्स 0.08% वाढून 8,730 च्या पातळीवर बंद झाला. त्याच वेळी, निफ्टी ऑटो 0.05% च्या घसरणीनंतर 24,005 च्या स्तरावर बंद झाला. बँक निफ्टी 1.20% च्या घसरणीनंतर 50,989 च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी फार्मा 1.23% च्या कमजोरीसह 23,264 च्या स्तरावर आणि निफ्टी IT 1.41% च्या मोठ्या घसरणीसह 43,727 च्या पातळीवर बंद झाला.

# बुरखा न घालणे ही क्रूरता नसल्याने पतीला या आधारावर घटस्फोट मागता येणार नाही

## घटस्फोट मंजूर करताना अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निरीक्षण

**प्रयागराज, दि. ३ वृत्तसंस्था**

महिलेने सार्वजनिक ठिकाणी बुरखा न घालणे ही क्रूरता नसल्याने पतीला या आधारावर घटस्फोट मागता येणार नाही, असे निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. पत्नी पारंपारिक रीतिरिवाज पाळत नसल्याचे कारण देत एका व्यक्तीने घटस्फोटाची याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायमूर्ती सौमित्र दयाल सिंग आणि न्यायमूर्ती दोनाडी रमेश यांच्या खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवले. असे असले तरी पती-पत्नी गेल्या २३ वर्षांहून अधिक काळ वेगळे राहत असल्याने न्यायालयाने या आधारावर त्यांचा घटस्फोट मंजूर केला.

मानसिक क्रूरता, पत्नी वारंवार एकटीच बाहेर फिरायची आणि 'परदा'ची (बुरखा) प्रथा पाळत नसल्याची कारणे देत पतीने घटस्फोटाची मागणी केली होती. पण न्यायमूर्ती सिंग यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने, "पत्नी एकटी बाजारात व इतर ठिकाणी जायची आणि ती बुरखा घालायची नाही", हा युक्तिवाद स्वीकारण्यास नकार दिला.



"पत्नीने किंवा एखाद्या व्यक्तीने कोणतेही बेकायदेशीर किंवा अनैतिक संबंध न ठेवता समाजातील इतर लोकांना भेटणे, याला क्रूरता म्हणता येणारे नाही, हे तथ्य आहे", असे न्यायमूर्ती सौमित्र दयाल सिंग आणि न्यायमूर्ती दोनाडी रमेश यांच्या खंडपीठाने म्हटले.

### पती-पत्नी २३ वर्षांपासून विभक्त

असे असले तरी, अलाहाबाद उच्च न्यायालयाने पतीला पत्नीने केलेल्या मानसिक क्रूरतेच्या आधारे घस्टस्फोटाची मागणी करण्याचा अधिकार असल्याचे म्हटले. पत्नीने २३ वर्षांपासून पतीबरोबर एकत्र राहण्यास नकार देत त्याला सोडून दिल्याने, पती या आधारावर घटस्फोट मागू शकतो, असेही उच्च न्यायालच्या खंडपीठाने सुनावणी वेळी स्पष्ट केले.

### पोटगीचा मुद्दाच अस्तित्वात नाही...

अलाहबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने पुढे म्हटले की, "पत्नीने केवळ पतीसोबत सहवासच नाकारला नाही, तर तिने पतीबरोबर कधी एकत्र राहण्याचा प्रयत्नही केला नाही." यामुळे पतीच्या घटस्फोटाच्या मागणीला परवानगी देताना अलाहाबाद उच्च न्यायालयाने नमूद केले की, "पती-पत्नी दोघेही नोकरीला आहेत. त्यांचा एकुलता एक मुलगा पत्नीबरोबर राहतो. त्याचे वय सुमारे २९ वर्षे आहे. त्यामुळे पोटगीची कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणात पोटगीचा मुद्दाच अस्तित्वात नाही."

# गाव आणि शहरातील अंतर घटले

## 12 वर्षांमध्ये ग्रामीण दारिद्र्य 25 टक्क्यांवरून 5 टक्क्यांवर

**नवी दिल्ली, दि. ३ वृत्तसंस्था**

भारतात गेल्या वर्षभरात ग्रामीण दारिद्र्य झपाट्याने कमी झाली, याचे कारण पहिल्यांदाच दारिद्र्य गुणोत्तर हे ५ टक्क्यांहून खाली गेले आहे, अशी माहिती एसबीआय रिसर्चने केलेल्या विश्लेषणात ही बाब समोर आली आहे. ग्रामीण भागातील खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण मागच्या वर्षीच्या ७.२ टक्क्यांहून २०२३-२४ मध्ये ४.८६ टक्क्यांपर्यंत खाली गेली आहे. विशेष म्हणजे २०११-१२ मध्ये हा आकडा २५.७ टक्के इतका होता. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एसबीआयच्या रिपोर्टमध्ये ही माहिती देण्यात आली आहे. शहरी भागांबद्दल बोलायचे झाल्यास, आर्थिक वर्ष २०२३ मध्ये दारिद्र्य ४.६ टक्क्यांवरून २०२४ मध्ये ४.०९ टक्क्यांवर आले आहे.

२०२१ जनगणना पूर्ण झाल्यावर आणि नवीन ग्रामीण शहरी लोकसंख्येचा वाटा निश्चि झाल्यावर या आकडेवारीत किरकोळ सुधारणा होऊ शकतात. याबरोबरच शहरी भागातील दारिद्र्य आणखी कमी होऊ शकते असा विश्वास देखील या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. याबरोबरच भारतातील दारिद्र्याचा दर सध्या ४ टक्के ते ४.५ टक्क्यांच्यामध्ये असू शकतो ज्यामध्ये अति दारिद्याचे प्रमाण खूपच कमी आहे, असेही आरबीआय रिसर्चने म्हटले आहे.

या रिपोर्टमध्ये दावा केला आहे की पायाभूत सुविधांमुळे शहरी भागातील गतिशीलता वाढत असून या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील अंतर कमी होत आहे. तसेच ग्रामीण भागातील उत्पन्नातील असमानता कमी होत आहे. ग्रामीण आणि शहरी भाग यांच्यातील अंतर कमी होण्याचे आणखी एक कारण हे सरकारी योजनांमधून आर्थिक मदतीचे होत असलेले थेट हस्तांतरण हे देखील सांगण्यात आले आहे.

ग्रामीण भाग आणि शहरी भागात मंथली पर कॅपिटा कंजम्शन एक्सपेंडिचर (MPCE) मधील फरक वेगाने कमी झाला आहे. एमपीसीई २००९-१० मध्ये ८८.२ टक्के आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये ७१.२ टक्के होता. जो आता कमी होऊन आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ६९.७ टक्क्यांवर आला आहे. डीबीटी, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न आणि खेड्यातील रहाणीमानात वेगाने झालेली सुधारणा यामुळे हा फरक दिसून आला आहे.

# आता चुकूनही जाणार नाहीत चुकीच्या खात्यात पैसे

## एनईएफटी आणि आरटीजीएस वापरणाऱ्या ग्राहकांसाठी आरबीआयचे मोठे पाऊल

**मुंबई, दि. ३ प्रतिनिधी**

RTGS आणि NEFT चा नियमित वापर करणाऱ्यांसाठी एक सकारात्मक बातमी आहे. आता ग्राहकांची चुकीच्या खात्यात पैसे पाठवण्यापासून सुटका होणार आहे. कारण इथून पुढे RTGS आणि NEFT द्वारे पैसे पाठवताना ग्राहकांना, पैसे पाठवणाऱ्या लाभार्थ्याचे नाव पाहता येणार आहे. ही सुविधा सुरू करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने देशातील सर्व बँकांना निर्देश दिले आहेत. या सुविधेमुळे ग्राहकांना पैसे पाठवण्यापूर्वी ते योग्य लाभार्थ्यालाच पैसे पाठवत आहेत का याची खात्री करता येणार आहे. चुकीचे व्यवहार कमी करणे हे या सुविधेमागील उद्दिष्ट आहे.

### १ एप्रिलपर्यंत बँकांना मुदत

दरम्यान यूपीआय आणि आयएमपीस द्वारे पैसे पाठवताना ग्राहकांना आधीपासूनच लाभार्थ्याच्या नावाची खात्री करण्याची सुविधा उपलब्ध आहे.याचप्रमाणे आता आरटीजीएस आणि एनईएफटी द्वारे व्यवहार करणाऱ्या ग्राहकांनाही ही सुविधा उपलब्ध होणार आहे. याबाबत आरबीआयने ३० डिसेंबर रोजी माहिती दिली आहे. दरम्यान आरबीआयने बँकांना १ एप्रिल २०२५ पर्यंत ही प्रणाली लागू करण्याचे निर्देश दिले आहेत.

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला ही नवीन सुविधा विकसित करण्याचे काम देण्यात आले आहे. त्यानंतर बँका ते त्यांच्या इंटरनेट बँकिंग आणि मोबाइल बँकिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देतील. दरम्यान बँकेत जाऊन व्यवहार करणाऱ्या ग्राहकांनाही ही सुविधा वापरता येणार आहे.

### कसे काम करणार नवी प्रणाली?

⇨ RTGS किंवा NEFT द्वारे व्यवहार करताना, ग्राहकांना लाभार्थ्याचा खाते क्रमांक आणि शाखेचा IFSC कोड टाकायला लागेल, त्यानंतर लाभार्थ्याचे नाव दिसेल. एकदा योग्य लाभार्थ्यालाच पैसे पाठवत असल्याची खात्री केल्यानंतर पैसे पाठवणारा याला परवानगी देईन आणि व्यवहार पूर्ण होईल.

⇨ आरबीआयने उचललेल्या या पाऊलामुळे चुकीचे खाते क्रमांक किंवा IFSC कोडमुळे चुकीच्या लाभार्थ्याला जाणारे पैसे रोखता येणार आहेत.

# रोहित शर्मा बाहेर बसणे आमच्यासाठी भावनिक -पंत

**सिडनी, दि. ३ वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाचव्या कसोटीला सिडनीमध्ये सुरुवात झाली आहे. जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया या सामन्यात खेळत आहे. कारण रोहित शर्माने या कसोटीत विश्रांती घेण्याचा निर्णय घेतल्याने तो सिडनी कसोटीत प्लेईंग इलेव्हनच्या निवडीसाठी उपलब्ध नव्हता. आता रोहितला वगळल्याबाबत ऋषभ पंतचे विधान समोर आले आहे. रोहित शर्माचा हा निर्णय भावुक असल्याचे ऋषभ पंत म्हणाला आहे.



सिडनी कसोटीत नाणेफेकीच्या वेळीस जसप्रीत बुमराहने प्लेईंग इलेव्हनबाबत सांगताना रोहित शर्माबाबत सांगितले. तेव्हा बुमराह म्हणाला, संघाचा कर्णधार रोहित शर्माने या सामन्यात विश्रांती घेण्याचा निर्णय घेत नेतृत्त्वाचं एक उत्तम उदाहरण दिलं आहे. यावरून संघातील एकजूट दिसून येते. जे संघाच्या हिताचं असेल तोच निर्णय घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो.

कर्णधार रोहित शर्माच्या संघाबाहेर होण्याच्या निर्णयाबाबत बोलताना ऋषभ पंत म्हणाला, "हा एक भावुक करणारा निर्णय आहे, यात शंकाच नाही. कारण तो गेल्या बऱ्याच काळापासून संघाचा कर्णधार आहे. आम्ही त्याच्याकडे संघाचे नेतृत्त्व करणारा एक नेता म्हणून पाहत आलो आहेत. पण असे काही निर्णय असतात ज्यामध्ये आमचा सहभाग नसतो आणि हा मॅनेजमेंटचा निर्णय आहे. मी त्या चर्चेचा भाग नव्हतो, त्यामुळे याबाबत जास्त काही सांगू शकणार नाही."

# होतकरू नेमबाजांना संधी देणारी स्पर्धा




**काही वर्षांपूर्वी केवळ क्रिकेट एके क्रिकेटलाच महत्व देणाऱ्या आपल्या देशात आता, क्रिकेटच्या व्यतिरिक्त इतरही क्रीडा प्रकाराना ज्या खेळांना ऑलिंपिक स्पर्धांमध्ये स्थान आहे, अशा स्पर्धांना शासकीय आणि सामाजिक स्तरावर देखील प्रोत्साहन मिळू लागले आहे.भारतातील होतकरू रायफल नेमबाज स्पर्धकांना संधी देणारी, भारताच्या माजी रायफल नेमबाज सुमा शिरूर यांच्या लक्ष शूटिंग क्लबचे माध्यमातून १५ वी आर आर लक्ष कप स्पर्धा पनवेल येथील कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी मध्ये ४ आणि ५ जानेवारीला संपन्न होणार आहे.याच अनुषंगाने लक्ष शूटिंग.क्लबच्या संचालिका , माजी रायफल नेमबाज अर्जुन पुरस्कार विजेत्या सुमा शिरूर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

साप्ताहिक संवाद

**१)आर आर लक्ष क्लब स्पर्धेचे स्वरूप काय असणार आहे?**

आर आर लक्ष कप स्पर्धा पनवेल मध्ये ४आणि ५ जानेवारी रोजी संपन्न होत आहे.यंदाचे या स्पर्धेचे १५ वे वर्ष असून,या स्पर्धेच्या माध्यमातून होतकरू नेंबाजना संधी मिळणार आहे.या स्पर्धेत राष्ट्रीय एअर रायफल नेमबाजी स्पर्धेतील पुरुष व महिला. विजेते शाहू मने आणि अन्या नायडू यांच्यासह दिव्यांग सिंग पवर,अर्जुन बबुला आणि संदीप सिंग यांच्यासारखे नामांकित ऑलिंपियन देखील सहभागी होतील.तर या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे लंडन. ऑलिंपिक स्पर्धेचे कांस्य पदक विजेते आणि पॅरिस ऑलिंपिक २०२४ साठी भारतीय संघाचे प्रमुख शेफ द मिशन गगन नारंग उपस्थित असणार आहेत.

**२)लक्ष कप स्पर्धेच्या आयोजना मागचा उद्देश काय आहे?**

आर आर लक्ष कप स्पर्धांचे आयोजन करण्यामागे आमचा उद्देश म्हणजे,खेळाडूंचे कौशल्य. ओळखणे,उत्कृष्टेला सन्मान देणे आणि नेमबाज यांना त्यांच्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करण्यासाठी सर्वोच्च व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे.ही स्पर्धा केवळ स्पर्धा नसून, ती मेहनतीचा,समर्पणाचा आणि खिलाडू वृत्तीचा उत्सव आहे.

**३)या स्पर्धेत विजेत्यांना पारितोषिक वितरीत केले जाईल त्याचे स्वरूप काय असेल?**

ही स्पर्धा वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन गटात होणार असून वरिष्ठ गटातील प्रथम विजेत्याला दीड लाख आणि ट्रॉफी तसेच भेटवस्तू मिळणार आहेत.तर कनिष्ठ गटातील प्रथम विजेत्याला ७५ हजार आणि ट्रॉफी व भेटवस्तू देण्यात येतील.वरिष्ठ गटात द्वितीय विजेत्याला ७५ आणि तृतीय विजेत्याला ४० हजार आणि भेटवस्तू तर कनिष्ठ गटातील द्वितीय विजेत्याला ४० हजार आणि तृतीय विजेत्याला २५ हजार आणि भेटवस्तू देण्यात येतील.शिवाय काही उत्तेजनार्थ पारितोषिक उत्कृष्ट नेमबाज यांना देण्यात येतील.

# भोपाळचे वरील लेक



मध्य प्रदेश, भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य, त्याचे प्रशासकीय केंद्र भोपाळमध्ये आहे. मोठ्या संख्येने अभ्यागत या प्रदेशाकडे आकर्षित होतात कारण त्याचा एक प्रसिध्द इतिहास आणि नैसर्गिकरित्या सुंदर आकर्षणे भरपूर आहेत."तलावांचे शहर" म्हणून ओळखल्या जाण्याव्यतिरिक्त, भोपाळला "भारतातील सर्वात हिरवे शहर" म्हणून देखील ओळखले जाते.

चला पर्यटनाला

अप्पर लेक हे भोपाळमधील सर्वात महत्वाचे सरोवर आहे, आणि भोजताल म्हणूनही प्रसिद्ध आहे. भोपाळच्या पश्चिमेला असलेल्या या कृत्रिम तलावाला देशातील सर्वात जुने तलाव म्हणून ओळखले जाते. तेथे राहणारे स्थानिक लोक याला बडा तालब म्हणूनही ओळखतात. तलाव हा रहिवाशांसाठी पिण्याच्या पाण्याचा मुख्य पुरवठा आहे आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दरवर्षी अंदाजे तीस दशलक्ष गॅलन पिण्याचे पाणी पुरवतो. अकराव्या शतकात कोलान्स नदी अडवून तलाव बांधणाऱ्या राजा भोजच्या नावावरून या आश्चर्यकारकपणे विस्तारलेल्या पाण्याचे नाव देण्यात आले. येथील लोककथा अशी आहे की शासकाने हा प्रचंड तलाव बनवला होता जेणेकरून तो त्याला झालेल्या त्वचेच्या आजारावर उपचार करू शकेल. तलावाच्या एका कोपऱ्यावर आढळणाऱ्या स्तंभावर राजा भोजचे शिल्प दिसू शकते. पुल पुख्ता या

लोकरंग

नावाने ओळखला जाणारा ओव्हरब्रिज अप्पर लेक आणि लोअर लेक यांच्यामध्ये विभक्त होण्यासाठी बसला आहे. अप्पर लेकच्या पूर्वेकडील बोट क्लबची निर्मिती करण्यात आली होती आणि आता ते पाहुण्यांना आनंद घेण्यासाठी विविध प्रकारचे जल क्रियाकलाप प्रदान करते, ज्यात पॅरासेलिंग, कयाक्स, पॅडलिंग आणि राफ्टिंग यांचा समावेश आहे. नयनरम्य कमला पार्क शेजारी दिसू शकते. रॉयल गार्डन एक म्हणून करते की दिले नवीन गोष्टींचा अनुभव घेण्यास उत्साही असलेल्यांसाठी एकत्र येण्याचे ठिकाण, उच्च हंगामात ते खूप व्यस्त असते. भोपाळला भेट देणाऱ्या ठिकाणांमध्ये बोट क्लब, सूर्यास्त आणि मत्स्यालय यांचा समावेश असेल, सर्व काही ताजी हवेने प्रसन्न होते.

# माझे शाळेतले प्रयोग

एका प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झालेल्या शिक्षिकेचा प्रवास या पुस्तकात मांडलेला आहे. मुलांना शिक्षणाची गोडी लागावी,विषयाचे आकलन व्हावे या विचाराने केलेले विविध अभ्यासाचे प्रयोग आणि त्यांचे विद्यार्थ्यांवर होणारे चांगले परिणाम याचा लेखाजोखा माझे शाळेतले प्रयोग या पुस्तकात मांडलेला आहे.




या पुस्तकाच्या लेखिका स्मिता गौड आहेत तर राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाची किंमत २४० रुपये आहे.

**प्रवासात भेटलेली माणसं**

अक्षररंग

भटकंती अर्थात दूरदूर प्रवासाला जाणं हि गोष्ट प्रत्येकालाच प्रिय असते. प्रवासात भेटलेली माणसं या पुस्तकात लेखकाने त्यांनी केलेल्या प्रदीर्घ प्रवासात त्यांना भेटलेल्या विविध माणसांचे शब्दचित्र रेखाटलेले आहे. लेखकाला भेटलेली हि माणसं,त्यांचे स्वभावधर्म आणि त्यांच्यातील वल्लीचा परामर्श मला भेटलेली माणसं या पुस्तकात वाचायला मिळतो. सुहास बारटक्के लिखित या पुस्तकाचे प्रकाशक नवचैतन्य प्रकाशन आहे तर किंमत १९० रुपये आहे.


संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# वाराणसी साहित्यिकाचा कुष्ठरोग वृद्धाश्रमात मृत्यू

## 80 कोटीची संपत्ती बळकावून वडिलांच्या अंत्यसंस्कारास कोणीच आले नाही

**वाराणसी, दि. ३ वृत्तसंस्था**

वाराणसी येथील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रसिद्ध साहित्यिक श्रीनाथ खंडेलवाल यांनी वृद्धाश्रमामध्ये अखेरचा श्वास घेतला. खंडेलवाल यांचे कुटुंबीयही आहेत पण त्यांच्या शेवटच्या क्षणी कोणीही आलं नाही, मुलगा बिझनेसमन आणि मुलगी वकील आहे. कोट्यवधींची पॉपर्टी असून देखील श्रीनाथ खंडेलवाल यांनी वृद्धाश्रमात अखेरचा श्वास घेतला. त्यांनी शेकडो पुस्तकं लिहिली आहेत.



श्रीनाथ खंडेलवाल यांचं मोठं कुटुंब आहे. त्यांना दोन मुलं आणि एक मुलगी आहे. त्यांचा एक मुलगा बिझनेसमन आहे आणि मुलगी सर्वोच्च न्यायालयात वकील आहे. त्यांच्या मुलांनी त्यांच्याकडून कोट्यवधींची संपत्ती हिसकावून घेतली आणि ते आजारी पडल्यावर त्यांना असंच रस्त्यावर सोडल्याचं म्हटलं जात आहे. यानंतर सामाजिक कार्यकर्ते अमन पुढे आले आणि त्यांनी त्यांना काशी कुष्ठरोग वृद्धाश्रमात ठेवलं.

वृद्धाश्रमात ते सुमारे दहा महिने राहिले आणि तेथे त्यांना मोफत सेवा देण्यात आली पण एकदाही कुटुंबातील कोणीही आलं नाही. त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली नाही. कोट्यवधींचे मालक आणि २०२३ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित अध्यात्मिक साहित्यकाराच्या मृत्यूनंतरही नातेवाईक आले नाही. त्यांनी येण्यास स्पष्ट नकार दिला. शेवटी समाजसेवक अमन यांनी देणगी गोळा करून अंत्यसंस्कार केले.

वाराणसीस्थित साहित्यिक श्रीनाथ खंडेलवाल यांचं शनिवारी निधन झालं. वयाच्या ८० व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. श्रीनाथ खंडेलवाल यांनी सुमारे ४०० पुस्तकं लिहिली आणि अनुवादित केली आणि ८० कोटी रुपयांच्या मालमत्तेचे मालक होते. सारनाथ येथील काशीकुष्ट सेवा संघ वृद्धाश्रमात बराच काळ वास्तव्य करत होते. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांची मुलं अंत्यदर्शनासाठी आली नाहीत.

# चंदन गुप्ता हत्याकांडात सर्व 28 दोषींना जन्मठेपेची शिक्षा

**लखनौ, दि. ३ वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशमधील कासगंज येथे २६ जानेवारी २०१८ रोजी निघालेल्या तिरंगा यात्रेदरम्यान चंदन गुप्ता यांची हत्या झाली. या प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेच्या विशेष कोर्टाने आपला निर्णय दिला आहे. कोर्टाने गुरुवार २ जानेवारी रोजी २८ आरोपींना दोषी ठरवले आहे. शुक्रवारी ३ जानेवारी रोजी दोषिंना शिक्षा सुनावली आहे. कोर्टाने २८ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.



एनआयए न्यायालयाची कायदेशीरता आणि सुनावणीला स्थगिती देण्याबाबत आरोपींनी उच्च न्यायालयात अर्ज केला होता. उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने हा अर्ज फेटाळला होता. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर लखनौच्या एनआयए विशेष न्यायालयाने गुरुवारी निकाल दिला, यावेळी न्यायालयाने शिक्षा सुनावली. सुमारे ८ वर्षे जुन्या प्रकरणात चंदन यांच्या वडिलांनी कासगंज पोलीस ठाण्यात २० नावाजलेल्या आणि इतर अज्ञात लोकांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

लखनौ कारागृहात शिक्षा भोगत असलेले २६ दोषी आहेत. यामध्ये वसीम जावेद उर्फ वसीम, नसीम जावेद, मोहम्मद जाहिद कुरेशी उर्फ जाहिद उर्फ जग्गा, आसिफ कुरेशी उर्फ हिटलर, अस्लम कुरेशी, अक्रम, तौफिक, खिल्लान, शवाब अली खान, राहत, सलमान, मोहसीन, आसिफ कुरेशी, आ. साकिब, बबलू, निशू उर्फ झीशान, वासीफ, कासगंज तुरुंगात बंद इमरान, शमशाद, जफर, साकीर, खालिद परवेझ, फैजान, इम्रान, साकीर, मोहम्मद आमिर रफी, मुनाजीर आणि कोर्टात शरण आलेल्या सलीम यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. लखनौ तुरुंगातून २६ दोषी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे जोडले आहेत. कासगंज तुरुंगाशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे दोषी मुनाजीरचा संबंध आहे.

या शिक्षेनंतर चंदन गुप्ता यांचे वडिलांनी प्रतिक्रिया दिली. या न्यायामुळे आम्ही खुश आहोत. न्यायाधीस आणि सर्वच लोकांचे आम्ही आभार मानतो. न्यायालयाने आमची साथ दिली आणि वकीलांनीही आम्हाला मदत केली.

# प्लेइंग 11 मधूनच नव्हे तर भारतीय संघातूनही रोहित बाहेर

**सिडनी, दि. ३ वृत्तसंस्था**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघानं 2024 साली T20 विश्वचषक जिंकला होता. विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय चाहत्यांनी ज्या खेळाडूला महान खेळाडूचा दर्जा दिला होता. आज त्याच खेळाडूची कसोटी कारकीर्द धोक्यात आली आहे. T20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेला रोहित शर्मा लवकरच कसोटी क्रिकेटमधूनही निवृत्ती घेऊ शकतो, असं दिसतंय. रोहित शर्मा टेस्ट फॉरमॅटमध्ये टीम इंडियाचा कर्णधार आहे, पण ऑस्ट्रेलियाच्या सततच्या फ्लॉपमुळं त्यानं पाचव्या टेस्ट मॅचमध्ये स्वतःला विश्रांती दिली. प्रत्येक भारतीय चाहत्यासाठी हा मोठा धक्का होता. या सगळ्यात रोहित शर्मा केवळ प्लेइंग 11 मधूनच बाहेर नाही तर तो भारतीय संघातूनही बाहेर झाला आहे.

वास्तविक, कोणताही क्रिकेट सामना सुरु होण्यापूर्वी दोन्ही संघ आपापली टीम शीट तयार करतात. ज्यात प्लेइंग 11 मध्ये समाविष्ट असलेल्या खेळाडूंशिवाय संघातील इतर खेळाडूंच्या नावांचाही समावेश आहे. सिडनी कसोटीपूर्वीही असंच घडलं. दोन्ही संघांनी आपापली टीम शीट जाहीर केली. यात भारतीय संघाच्या टीम शीटमध्ये सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे रोहित शर्माचं नाव त्यात नव्हतं. विश्रांती घेतलेल्या खेळाडूचे नाव टीम शीटच्या बाहेर असल्याचं यापूर्वी कधीही घडलं नाही. तसंच टीम शीटमध्ये कर्णधाराचं नाव न राहिल्यानं आश्चर्य व्यक्त होत आहे.

# Apple च्या Siri वर युजर्सचे खासगी संभाषण रेकॉर्ड; ९.५ कोटी डॉलर दंड भरणार

**कॅलिफोर्निया, दि. ३ वृत्तसंस्था**

Apple म्हटलं की दर्जा असंच मानण्याची प्रथा पडलेली आहे. त्याशिवाय ॲपलचे फोन किंवा इतर उत्पादने म्हणजे सुरक्षेची हमी असेही दावे फक्त कंपनीच नव्हे तर ही उत्पादनं वापरणारे युजर्सदेखील म्हणतात. पण ॲपलच्या उत्पादनामध्येच वापरकर्त्यांच्या खासगी संभाषणांचा गैरवापर झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. कंपनीकडून हा दावा फेटाळण्यात आला असला तरी नुकसानभरपाईसाठी ठरवण्यात आलेली ९५ मिलियन डॉलर्स म्हणजेच साधारणपणे ९.५ कोटी डॉलर दंडाची रक्कम अदा करण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे तक्रारदार वापरकर्त्यांना प्रत्येकी सुमारे २० डॉलर्स म्हणजेच भारतीय चलनात १७०० रुपये मिळण्याची शक्यता आहे.

अमेरिकेतील ओकलँड कॅलिफोर्निया फेडरल कोर्टात या प्रकरणाची सविस्तर सुनावणी चालू आहे. मंगळवारी रात्री Apple कडून सुनावणीदरम्यान दंडाची रक्कम भरण्यास तयार असल्याचं न्यायालयात सांगितलं. ही दंडाची रक्कम ९५ मिलियन डॉलर्स इतकी असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. रॉयटर्सनं दिलेल्या वृत्तानुसार, यातून प्रत्येक तक्रारदाराला साधारण २० डॉलर्स मिळण्याची शक्यता आहे. मात्र, यासाठी न्यायमूर्तींच्या परवानगीची आवश्यकता असेल. अमेरिकेतल्या काही ॲपल वापरकर्त्यांनी यासंदर्भात तक्रार दाखल केली होती. ॲपलवरील Siri ही सुविधा सुरू केल्यानंतर डिव्हाईस युजर्सचे खासगी संभाषणदेखील रेकॉर्ड करतो व ही माहिती जाहिरातदारांना दिली जाते, असा दावा वापरकर्त्यांकडून करण्यात आला आहे.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर, ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com